दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी
छत्रपती संभाजीनगर ❀ शनिवार, दि. ०६ जून २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : ४७ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com

## दक्षिणेतील 'कमळ' कोमेजले

केंद्र सरकारने आणि सत्ताधारी पक्षाने दक्षिण भारतात पाय रोवण्यासाठी ज्या चेहऱ्यावर संपूर्ण शक्ती पणाला लावली होती, तोच हुकमी एक्का आता हातातून निसटला आहे. तामिळनाडूमध्ये भाजपचा मुख्य कणा मानले

---> अग्रलेख - पान 2 वर

## मान्सून गोव्यात पोहोचला

**पणजी :** मान्सून गुरुवारी केरळमध्ये दाखल झाला असून सध्या मान्सूनचा उत्तरेकडे प्रवास सुरू आहे. दरम्यान, मान्सूनचे शुक्रवारी गोव्याच्या काही भागात आगामन झाल्याची माहिती हवामान विभागाने दिली. सध्या मान्सून महाराष्ट्राच्या वेशीपर्यंत पोहोचला आहे. लवकरच तळकोकणात मान्सूनचे आगमन होईल, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.सॅटेलाईट प्रतिमांमध्ये केरळ किनारपट्टी, कर्नाटक आणि गोव्याच्या संपूर्ण किनापट्टीवर शुक्रवारी सकाळी दाट ढगांची दाटी दिसून येत होती. त्यामुळे हळूहळू मान्सून पुढे सरकत असल्याचे दिसून येत होते.

# मणिपूरमध्ये हिंसाचार, महिलेसह तिघांची हत्या




**कांगपोकपी :** मणिपूरमधील कांगपोकपी जिल्ह्यातील सैतु-गाम्फाजोल उपमंडळातील लोइबोल खुल्लेन गावात शुक्रवार ५ जून २०२६ रोजी पहाटे हिंसाचार उसळला. या हिंसाचारात एक महिला, तिचा पती आणि एक अन्य व्यक्ती अशा तीन जणांची हत्या झाली. सशस्त्र हल्लेखोरांनी तिघांची हत्या केली. तसेच हल्लेखोरांनी काही घरांना आग लावली. एकूण सात घरं जळून खाक झाली.

दोन गटांच्या हिंसक संघर्षाची तीव्रता वाढू लागल्याचे बघून अनेकांनी जीव वाचवण्यासाठी जवळच्या जंगलात लपून राहणे पसंत केले. गावात काही काळानंतर शांतता पसरली. यानंतर धाडस करून पुढे आलेल्या स्थानिकांनी हत्या झालेल्या तिघांची ओळख पटवली आहे. लेतखोंगाम हाओकिप, टिनमेरी हाओकिप आणि जांगमिनलाल हाओकिप यांची हत्या झाल्याचे स्थानिकांनी सांगितले. हल्लेखोरांनी गोळीबार केला. या गोळीबारात तीन जणांचा मृत्यू झाल्याची माहिती स्थानिकांनी दिली.

गावातील हिंसेचा कुकी इनपी मणिपूर (केआयएम) या संघटनेने जाहीर निषेध केला आहे. मारेकऱ्यांना शोधून अटक करावी आणि कठोर शिक्षा करावी अशी मागणी केआयएमने (KIM) केली आहे. निरपराध आणि निःशस्त्र व्यक्तींवर हल्ला करणे आणि त्यांची हत्या करणे हे निषेधार्ह कृत्य आहे. या कृत्याचे कधीही समर्थन होऊ शकत नाही. सामान्यांची हत्या करणारे मानवाधिकारांचे उल्लंघन करत आहेत, असेही कुकी इनपी मणिपूर (केआयएम) या संघटनेने सांगितले.

# कॉकरोच जनता पार्टीचे पंतप्रधान मोदींना धर्मेंद्र प्रधान यांच्या हकालपट्टीचे आवाहन; अभिजित दीपके आंदोलनासाठी दिल्लीत दाखल होणार

## जंतर-मंतरवर शांततापूर्ण आंदोलनासाठी जमत आहे कार्यकर्त्यांची फौज; दिल्ली हायकोर्टाचा तातडीच्या सुनावणीस नकार




**नवी दिल्ली :** सोशल मीडियावरील एक उपरोधिक मोहीम म्हणून सुरू झालेली 'कॉकरोच जनता पार्टी' (सीजेपी) सध्या देशभरात प्रचंड चर्चेचा विषय बनली आहे. या पक्षाचे संस्थापक अभिजित दीपके हे देशातील बिघडलेल्या शिक्षण व्यवस्थेच्या निषेधार्थ आणि केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी दिल्लीत दाखल होत आहेत. त्यांच्या या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पक्षाच्या वतीने थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना जाहीर आवाहन करण्यात आले असून शिक्षण मंत्र्यांना तातडीने पदमुक्त करण्याची मागणी करण्यात आली आहे.

पक्षाचे प्रवक्ते सौरव दास आणि आशुतोष रांका यांनी दिलेल्या माहितीनुसार, अभिजित दीपके हे सकाळी दिल्ली विमानतळावर उतरणार आहेत. तेथून ते कार्यकर्त्यांसह थेट संसद मार्ग पोलीस ठाण्यात जाऊन जंतर-मंतरवर शांततापूर्ण आणि लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यासाठी रीतसर परवानगी मागणार आहेत. सीजेपीच्या प्रवक्त्यांनी स्पष्ट केले आहे की, हे आंदोलन पूर्णपणे शांततेच्या मार्गाने आणि कायद्याच्या चौकटीत राहूनच केले जाईल. सोशल मीडियावरून या आंदोलनाबाबत अनेक अफवा पसरवल्या जात असून, कार्यकर्त्यांनी कोणत्याही प्रकारच्या हिंसेला किंवा अव्यवस्थेला बळी पडू नये, असे आवाहन आशुतोष रांका यांनी केले आहे. तसेच त्यांनी कार्यकर्त्यांना आपल्यासोबत तिरंगा झेंडा, पुस्तके आणि फुले घेऊन येण्यास सांगितले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना उद्देशून बोलताना सीजेपीच्या प्रवक्त्यांनी देशातील शिक्षण व्यवस्थेच्या दुरवस्थेवर तीव्र बोट ठेवले आहे. सध्याचे शिक्षण मंत्री नाकाबिल असून त्यांच्या कार्यकाळात झालेल्या अनेक पेपर लीकच्या प्रकरणांमुळे कोट्यवधी विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात आले आहे, असा थेट आरोप पक्षाने केला आहे. यामुळे अनेक तरुण विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याची दुर्दैवी परिस्थिती निर्माण झाली असून, लोकशाहीवरील जनतेचा विश्वास कायम ठेवण्यासाठी मोदींनी धर्मेंद्र प्रधान यांना तात्काळ मुख्यमंत्रिपदावरून किंवा त्यांच्या मंत्रीपदावरून बरखास्त करावे, अशी मागणी प्रवक्त्यांनी लावून धरली आहे. दुसरीकडे, या प्रस्तावित आंदोलनावर बंदी घालण्यासाठी किंवा गर्दीच्या व्यवस्थापनासाठी 'सेव्ह इंडिया फाऊंडेशन'च्या वतीने दिल्ली हायकोर्टात एक जनहित याचिका दाखल करण्यात आली होती. कॉकरोच जनता पार्टी सोशल मीडियावरून तरुणांची मोठी गर्दी जमवत असल्यामुळे विमानतळ आणि संवेदनशील भागातील सार्वजनिक सुरक्षा धोक्यात येऊ शकते, असा दावा या याचिकेत करण्यात आला होता. मात्र, दिल्ली हायकोर्टाच्या न्यायमूर्ती सौरभ बॅनर्जी आणि न्यायमूर्ती अमित शर्मा यांच्या खंडपीठाने या याचिकेवर तातडीने सुनावणी घेण्यास स्पष्ट नकार दिला आहे. यामुळे आता अभिजित दीपके यांच्या नेतृत्वाखालील या आंदोलनाकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे.

### आंदोलनाला शिवसेनेचा पाठिंबा ?

**अण्णा हजारेंनी या आंदोलनाला आशीर्वाद द्यावा असे संजय राऊत यांनी म्हटले आहे. दिल्लीतील जंतर-मंतर येथे होणाऱ्या कॉकरोच जनता पार्टीच्या (सीजेपी) आंदोलनाची सध्या देशभरात जोरदार चर्चा सुरू आहे. या बहुचर्चित आंदोलनाबाबत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी एक महत्त्वाची प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी या आंदोलनाला थेट अधिकृत पाठिंबा जाहीर केला नसला, तरी देश वाचवण्यासाठी आणि लोकशाही बळकट करण्यासाठी पुढे येणाऱ्या अशा चळवळींना सर्वांनी शुभेच्छा दिल्या पाहिजेत, असे स्पष्ट मत व्यक्त केले आहे.**

# वैजापूरजवळ वऱ्हाडाच्या टेम्पोला कंटेनरची धडक; दोन ठार, अनेक जखमी

## पैठणच्या ठाकरे कुटुंबाचे वऱ्हाड येवल्याकडे जाताना काळाचा घाला; तीन जणांची प्रकृती गंभीर




**वैजापूर :** लग्नाचे वऱ्हाड घेऊन जाणाऱ्या टेम्पोची आणि कंटेनरची समोरासमोर जोरदार धडक होऊन झालेल्या भीषण अपघातात दोन जण ठार, तर अनेक जण जखमी झाले आहेत. हा अपघात वैजापूर-गंगापूर रस्त्यावरील घायगाव शिवारात दुपारच्या सुमारास घडला. या अपघातातील मृतांमध्ये ज्ञानेश्वर रूपचंद वाघ आणि अनिता वामन वाघ (दोघेही रा. पाटेगाव, ता. पैठण) यांचा समावेश आहे. जखमींपैकी तिघांची प्रकृती अत्यंत गंभीर असल्याचे समजते.

मिळालेल्या माहितीनुसार, पैठण तालुक्यातील पाटेगाव येथील काशिनाथ ठाकरे यांच्या मुलाचा विवाह येवला तालुक्यातील गोपाळवाडी येथील शिवाजी वाघ यांच्या मुलीशी होणार होता. या लग्नासाठी वऱ्हाडी दोन टेम्पोमधून येवल्याकडे जात होते. दरम्यान, घायगाव शिवारात वऱ्हाड्यांचा टेम्पो आला असता समोरून येणाऱ्या कंटेनरशी त्याची समोरासमोर भीषण धडक झाली. या टेम्पोमध्ये सुमारे पंचवीस प्रवासी प्रवास करत होते. यातील ज्ञानेश्वर वाघ यांचा जागीच मृत्यू झाला, तर अनिता वाघ यांचा रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. या अपघातामुळे लग्नाचा आनंद क्षणात शोकात बदलला आहे.

अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी तातडीने धाव घेत मदतकार्य सुरू केले. जखमींना वाहनातून बाहेर काढून रुग्णवाहिकांच्या मदतीने वैजापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे प्राथमिक उपचार करून सर्व जखमींना पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात हलविण्यात आले आहे. या घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलिस अधिकारी भागवत फुंदे, पोलिस निरीक्षक सत्यजित ताईतवाले आणि सहाय्यक पोलिस निरीक्षक अर्चना अभंग यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. अपघातामुळे रस्त्याच्या मध्यभागी वाहने आडवी झाल्याने या मार्गावरील वाहतूक काही काळ ठप्प झाली होती. पोलिसांनी अपघातग्रस्त वाहने क्रेनच्या सहाय्याने बाजूला केल्यानंतर वाहतूक पूर्ववत झाली.

# जि.प.शाळेच्या मुख्याध्यापकाने शाळेतच संपवले जीवन

**छत्रपती संभाजीनगर / दौलताबाद :** येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापकांनी शाळेच्या कार्यालयातच गळफास घेऊन आत्महत्या केल्याची अत्यंत धक्कादायक घटना समोर आली आहे. या दुर्दैवी घटनेमुळे संपूर्ण शैक्षणिक वर्तुळात आणि छत्रपती संभाजीनगर परिसरात एकच खळबळ उडाली आहे. नितीन मोहन कांबळे असे आत्महत्या केलेल्या मुख्याध्यापकांचे नाव असून, ते पडेगाव येथील माजी सैनिक कॉलनीचे रहिवासी होते. भरदिवसा शाळेच्या आवारातच ही घटना घडल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मुख्याध्यापक नितीन कांबळे हे नेहमीप्रमाणे सकाळी पडेगाव येथून ऑटो रिक्षाने शाळेत आले होते. शाळेत पोहोचल्यानंतर त्यांनी संबंधित रिक्षाचालकाला दुपारी परत येण्यास सांगितले होते. त्यानुसार दुपारी जेव्हा रिक्षाचालक त्यांना घेण्यासाठी शाळेत आला, तेव्हा त्याला मुख्याध्यापकांचे कार्यालय आतून बंद असल्याचे जाणवले. त्याने खिडकीतून डोकावून पाहिले असता, मुख्याध्यापक कांबळे यांनी कार्यालयातील छताच्या पंख्याला रुमालाच्या सहाय्याने गळफास घेतल्याचे धक्कादायक दृश्य निदर्शनास आले. रिक्षाचालकाने तातडीने या घटनेची माहिती आसपासच्या नागरिकांना दिली.

या घटनेची माहिती मिळताच दौलताबाद पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक संदीप वाघ यांनी आपल्या पोलीस पथकासह तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी ग्रामस्थांच्या मदतीने खोलीचा दरवाजा उघडून कांबळे यांना खाली उतरवले आणि उपचारासाठी तात्काळ छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात दाखल केले. मात्र, तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना तपासताच मृत घोषित केले. त्यांच्या या टोकाच्या पाऊलामुळे शाळेतील विद्यार्थी आणि शिक्षक वर्गाला मोठा धक्का बसला आहे.

# जनगणनेच्या कामात हलगर्जीपणा; पर्यवेक्षकासह दहा जणांवर गुन्हे दाखल

## आदेशानंतरही कामावर गैरहजर राहिल्याने परभणीत पोलिसांची कारवाई

**परभणी :** राष्ट्रीय कार्यक्रमांतर्गत सुरू असलेल्या जनगणनेच्या अत्यंत महत्त्वाच्या कामात हलगर्जीपणा करणे आणि आदेश देऊनही कर्तव्यावर हजर न राहणे कर्मचाऱ्यांना चांगलेच भोवले आहे. परभणी शहरात जनगणनेच्या कामात कसूर केल्याप्रकरणी पर्यवेक्षक आणि प्रगणकांसह एकूण दहा कर्मचाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या धडक कारवाईमुळे शासकीय कामात दिरंगाई करणाऱ्या कर्मचाऱ्यांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सध्या देशपातळीवर राष्ट्रीय जनगणनेचे काम सुरू असून, त्यासाठी विविध विभागांतील कर्मचाऱ्यांची पर्यवेक्षक व प्रगणक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. संबंधित कर्मचाऱ्यांनी या राष्ट्रीय कामासाठी तात्काळ हजर राहून आपले कर्तव्य पार पाडावे, असे स्पष्ट आदेश प्रशासनाने दिले होते. मात्र, असे असतानाही अनेक कर्मचारी या कामाकडे पाठ फिरवून कर्तव्यावर गैरहजर राहिले. राष्ट्रीय कामात अडथळा आणल्याने आणि आदेशाचे उल्लंघन केल्याने या कर्मचाऱ्यांवर लोकप्रतिनिधित्व अधिनियमांतर्गत कारवाई करण्यात आली आहे.

याप्रकरणी जनगणना अधीक्षक सय्यद अवेज हशमी यांनी नवामोंढा पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. त्यानुसार मोहम्मद सन्नाऊल्ला खान, प्रभाकर भोंडवे, प्रशांत रेंगे, अनंत किरडे, जब्बार अली खान, गोविंद रोडे आणि सचिन रोडे यांच्यावर गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार टाके करत आहेत.

दुसरीकडे, सय्यद जुबेर हाशमी यांनी नानलपेठ पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून दीपक बंद, आनंद कदम आणि संतोष शेळके यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक पवार करत आहेत. राष्ट्रीय कर्तव्यात कसूर करणाऱ्या कोणत्याही कर्मचाऱ्याची गय केली जाणार नाही, असा इशारा प्रशासनाने दिला आहे.

# पिंपरीतील दुर्दैवी घटना; 13 वर्षीय विद्यार्थी साई घुनावतचा मृतदेह शेततळ्यात सापडला

## नाथ माध्यमिक विद्यालयानजीकच्या शेततळ्यात घडली घटना; कुटुंबीयांकडून घातपाताचा संशय



**खुलताबाद :** तालुक्यातील पिंपरी येथे एक अत्यंत दुर्दैवी आणि धक्कादायक घटना समोर आली आहे. येथील नाथ माध्यमिक विद्यालय शाळेजवळील एका शेततळ्यात १३ वर्षीय शालेय विद्यार्थी साई बाबुलाल घुनावत याचा मृतदेह आढळून आला आहे. या घटनेमुळे संपूर्ण पिंपरी गावात आणि परिसरात एकच खळबळ उडाली असून सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. दरम्यान, साईच्या कुटुंबीयांनी या प्रकरणात घातपाताचा संशय व्यक्त केल्यामुळे या प्रकरणाला आता वेगळे वळण मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, साई हा पिंपरी येथे शिक्षण घेत होता. दुपारच्या सुमारास शाळेनजीक असलेल्या एका शेतकऱ्याच्या गट क्रमांकातील शेततळ्यात त्याचा मृतदेह तरंगताना आढळून आला. हा मृतदेह सर्वात आधी दोन मुलांच्या निदर्शनास आला. त्यांनी तातडीने आरडाओरड करून या घटनेची माहिती गावातील नागरिकांना दिली. माहिती मिळताच गावकऱ्यांनी मोठ्या संख्येने घटनास्थळी धाव घेतली आणि साईला शेततळ्यातून बाहेर काढले.

या घटनेची माहिती मिळताच खुलताबाद पोलीस ठाण्याच्या पथकाने तातडीने घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. गावकऱ्यांच्या मदतीने साईला तातडीने उपचारासाठी वेरूळ येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले होते. मात्र, तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासून त्याला मृत घोषित केले. यानंतर मृतदेहाचे शवविच्छेदन करण्यात आले. साई हा आपल्या आई-वडिलांचा एकुलता एक मुलगा होता. घरातील एकमेव कुलदीप आणि भविष्याचा आधार हरपल्यामुळे घुनावत कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून त्यांच्या आक्रोशाने उपस्थितांचेही डोळे पाणावले होते. दरम्यान, या संपूर्ण घटनेबाबत परिसरात अनेक प्रश्न आणि संशय उपस्थित केले जात आहेत. ज्या शेततळ्यात साईचा मृतदेह सापडला, ते ठिकाण त्याच्या घरापासून बरेच अंतरावर असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे तो एवढ्या लांब कसा गेला, त्यावेळी त्याच्यासोबत कोणी होते का, याबाबत विविध चर्चांना उधाण आले आहे. साईच्या आई-वडिलांनी आणि नातेवाईकांनी हा केवळ अपघाती मृत्यू नसून घातपात असण्याची शक्यता वर्तवली आहे. आमच्या मुलाच्या मृत्यूचे नेमके कारण काय, याचे सत्य समोर आले पाहिजे अशी मागणी करत कुटुंबीयांनी या प्रकरणाची सखोल व निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी केली आहे. शवविच्छेदन अहवाल आल्यानंतरच मृत्यूचे खरे कारण स्पष्ट होईल, असे पोलिसांकडून सांगण्यात येत असून पोलिसांनी सर्व बाजूंनी तपास सुरू केला आहे.

# गंगाखेड नगरपरिषदेत कोट्यावधीचा भ्रष्टाचाराचा घोटाळा

## बेकायदा पद भरती सह. नपची 20 कोटीची जागा दगडू बाईगुठे प्रतिष्ठानला


**गंगाखेड :** नगर परिषदेच्या प्रशासकीय कालावधीत बेकायदेशीर पदभरतीसह शहरातील सर्वे नंबर 251 मधील अंदाजित रक्कम पंधरा ते वीस कोटी ची 4800 स्क्वेअर फुट जागा शासनाच्या हस्तांतरणाची परवानगी न घेताच तात्कालीन प्रशासकीय अधिकारी जीवराज डापकर सीईओ जयवंत सोनवणे यांनी दगडूबाई प्रतिष्ठानला कोणत्या नियमात जागा दिली तसेच घनकचरा व्यवस्थांपणात झालेल्या भ्रष्टाचाराची खोल खोल राष्ट्रवादीचे गट नेते मिथिलेश केंद्रे यांनी पत्रकार परिषदेत केल्याने नगर परिषदेत भ्रष्टाचाराचा स्फोटझाल्याचे चित्र स्पष्ट झालेआहे.

राष्ट्रवादी कार्यालयासमोर आज शुक्रवार रोजी घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत राष्ट्रवादीचे गटनेते नितिलेश केंद्रे नगरसेवक सुनील चौधरी खंदारे प्रवीण घोबाळे प्रमोद मस्के रणधीर राजे भालेराव मान्यवर उपस्थित होते यावेळी मिथिलेश केंद्रे यांनी यशवंत सेनेच्या नगरसेवकांनी पत्रकार परिषद केलेल्या आरोपाचा पुरावे निशी उत्तर दिले .

नगरपरिषद आजपर्यंत तीन सर्वसाधारण सभा घेण्यात आल्या 15 एप्रिल रोजी सीईओ यांना पत्र देत सर्वसाधारण सभा घेण्यात बाबत सुचविले असता दिनांक 21 एप्रिल रोजी सर्व नगरसेवकांना पत्र देत प्रभागातील मूलभूत समस्या अडचणी यासंदर्भात लेखी समस्या चे निवेदन देण्या बाबत सुचविले असता यशवंत सेनेचे सौं साळवे व यानपाल्लेवर यांनी लेखी समस्या चे निवेदन देण्यात आले व गटनेते एड अकबर यांनी पंतप्रधान आवास योजनेचा सन2019 ते 2026 पर्यंत पात्र लाभार्थी ना देण्यात आलेल्या अनुदानाच्या संचिकेच्या

प्रतीची मागणी केली. या सर्व बाबी सर्वसाधारण सभेत येता येतात का? प्रश्नही यावेळी उपस्थित करण्यात आला. नगरपरिषदेतील घनकचरा व्यवस्थापनामध्ये मोठ्या प्रमाणात गैरप्रकार प्रशासकीय काळात करण्यात आला नागराल प्रायव्हेट कंपनीत एका वर्षासाठी दिलेल्या ठेका नियमबाहय तीन वर्षे चालवण्यात आला या नागराज कंपनीस अकरा लाख ते बारा लाखाची बिल प्रतिमाह काढण्यात आले. एस आय यांनी नियमबाह्य केले एस आय यांना एमबी रेकॉर्ड करण्याचा अधिकारच नाही तर नागराल कंपनीचे काम संपण्यापूर्वीच आठ लाखाची अनामत रक्कम परत कोणत्या नियमात केली याबाबत तसेच स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे लोककल्याण निधी हा आरोग्य पर्यावरण पर्यटन साठी असून तो इतरत्र वापरता येत नसताना या निधीतून प्रभागात सोलार पथदिव्यसह इतर कामाचा प्रस्ताव देण्यात आला शासकीय काळात अनेक बेकायदेशीर निर्णय घेण्यात आले गंगाखेड नगरपरिषद आर्थिक व्यवहारांमध्ये जनतेचे कर रोपाने जमा झालेले पैशाचे उधळ पट्टी करण्यात आली काही निवडक व्यक्ती आणि हित संबंध गटांना लाभ मिळावा यासाठी नियमांना बगल देण्यात आल्याचा आरोपही त्यांनी केला अस्तित्वातनसलेल्या बनावट आवक-जावट 1932 क्रमांक वापर करून पाच ते सात जणांची नोकर भरती करण्यात आल्याचा दावा करीत संबंधित भरती प्रक्रियेत प्रशासकाने कागदपत्रांमध्ये फेरफार करून नियमबाह्य नियुक्त्या दिल्याचा आरोप करण्यात आला या भरती प्रक्रियेत सखोल चौकशी झाल्याचा अनेक धक्कादायक बाबी समोर येतील असा दावा मिथिलेश केंद्रे यांनी केलानगर परिषदेत प्रशासकीय राजवटीच्या काळात अनेक अनेक विकास कामे खरेदी प्रक्रिया कंत्राटे व कर्मचारी नियुक्तीमध्ये मोठ्या प्रमाणात गैरविवार झाला आहे या प्रकरणातील संबंधित कागदपत्राची चौकशी करून दोषीवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची गरज असल्याचे गटनेते केंद्रे यांनी स्पष्ट केल्याने शहरातील राजकीय प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये संतापाची भावना व्यक्त होत आहे आवक-जावक नोंदीमध्ये फेरफार करून नियुक्तया देण्यात आले असतील तर नगरपरिषद इतर आर्थिक व्यवहारांमध्ये अशाच प्रकारच्या अनियमित्ताझाल्याने सखोल निपक्ष चौकशी होणे गरजेचे आहे प्रशासकीय काळात आणखी किती गैरव्येवहार झाले याचा कोणा कोणाला लाभ मिळाला याची नावे जाहीर होणे ही काळाची गरज आहे अशी जोरदार चर्चा सर्वसामान्य नागरिकांमधून होत आहे.

# काळेश्वर मंदिरातून परतणाऱ्या युवकाची निर्घृण हत्या; चार आरोपी पोलिस ताब्यात



**नवीन नांदेड (प्रतिनिधी) :** काळेश्वर मंदिरात सायंकाळची आरती करून घरी परतणाऱ्या एका युवकावर चार जणांनी धारदार शस्त्रांनी जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली. गंभीर जखमी झालेल्या युवकाचा उपचारादरम्यान आज पहाटे मृत्यू झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. या घटनेनंतर जीवघेण्या हल्ल्याचे प्रकरण आता खुनात रूपांतरित झाले आहे.

माहितीनुसार, अर्जुन तातेराव हंबर्डे (वय 31) हे काल रात्री सुमारे 8.30 वाजता नेहमीप्रमाणे काळेश्वर मंदिरात सायंकाळच्या आरतीसाठी गेले होते. आरतीनंतर ते घरी परतत असताना मंदिराजवळील चौकात चार जणांनी त्यांना अडवून अचानक हल्ला चढवला. धारदार शस्त्रांनी करण्यात आलेल्या या हल्ल्यात अर्जुन हंबर्डे गंभीर जखमी झाले.

घटनेनंतर स्थानिकांच्या मदतीने त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचार सुरू असतानाच आज पहाटे त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या निधनामुळे परिसरात शोककळा पसरली आहे.

या प्रकरणी नांदेड ग्रामीण पोलिसांनी प्रवीण हंबर्डे, शेख आरिफ, चैतन्य पांचाळ आणि सुरज तगडे या चार संशयितांना ताब्यात घेतले असून, हल्ल्यामागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. पोलिसांकडून सखोल तपास सुरू असून, एफआयआरमधील अधिक तपशील समोर येणे बाकी आहे. मृत अर्जुन हंबर्डे यांच्या पश्चात वडील, पत्नी, एक मुलगी, बहीण आणि भाऊ असा परिवार आहे. आज दुपारी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले असून, संपूर्ण परिसरात शोक व्यक्त केला जात आहे.

# सं पा द की य

## दक्षिणेतील 'कमळ' कोमेजले; अन्नामलाईंचे बंड की भाजपच्या कार्यपद्धतीचा पराभव?

केंद्र सरकारने आणि सत्ताधारी पक्षाने दक्षिण भारतात पाय रोवण्यासाठी ज्या चेहऱ्यावर संपूर्ण शक्ती पणाला लावली होती, तोच हुकमी एक्का आता हातातून निसटला आहे. तामिळनाडूमध्ये भाजपचा मुख्य कणा मानले जाणारे धडाडीचे नेते के. अन्नामलाई यांनी अचानक पक्षाला रामराम ठोकल्यामुळे राजकीय वर्तुळात प्रचंड भूकंप झाला आहे. हा केवळ एका नेत्याचा राजीनामा नसून, दिल्लीतील केंद्रीय नेतृत्वाच्या कार्यपद्धतीवर आणि प्रादेशिक नेत्यांना दुय्यम स्थान देण्याच्या सरकारच्या धोरणावर बसलेला हा एक मोठा चपराक आहे. एक सक्षम आणि माजी पोलीस अधिकारी असलेला नेता जेव्हा थेट राष्ट्रीय पक्षाला सोडून स्वतःची स्वतंत्र राजकीय चळवळ सुरू करण्याची घोषणा करतो, तेव्हा सरकारच्या अंतर्गत हुकूमशाहीवर गंभीर प्रश्न निर्माण होतात. गेल्या काही वर्षांपासून केंद्र सरकार दक्षिण भारतात, विशेषतः तामिळनाडू आणि केरळमध्ये आपली ताकद वाढवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न करत आहे. यासाठी स्थानिक नेत्यांना बळ देण्याऐवजी दिल्लीतून सूत्रे हलवण्यावर जास्त भर दिला जात होता. अन्नामलाई यांनी तामिळनाडूमध्ये पक्षाला तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी अहोरात्र कष्ट घेतले, मात्र पक्षाच्या अंतर्गत राजकारणामुळे आणि स्थानिक अस्मितेपेक्षा दिल्लीच्या आदेशाला जास्त महत्त्व देण्याच्या वृत्तीमुळे अखेर त्यांचा संयम सुटला. प्रादेशिक पातळीवर काम करणाऱ्या सक्षम नेत्यांची कोंडी करण्याचे सरकारचे धोरण या बंडाला कारणीभूत ठरले आहे. राष्ट्रीय पक्षांच्या या वर्चस्ववादी मानसिकतेमुळेच दक्षिणेतील राज्यांमध्ये प्रादेशिक अस्मिता अधिक प्रबळ होत चालली आहे, हे या घटनेवरून पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. अन्नामलाई यांच्या या बंडखोरीमुळे भाजपच्या दक्षिण दिग्विजयाच्या स्वप्नांना मोठा तडा गेला आहे. विरोधकांनी या मुद्द्यावरून सरकारवर जोरदार टीका अस्त्र सोडले असून, हे भाजपच्या अंतर्गत हुकूमशाहीचे अपयश असल्याचे म्हटले आहे. या धक्कादायक घडामोडीमुळे केवळ तामिळनाडूच नाही, तर संपूर्ण दक्षिण भारतातील राजकीय समीकरणे बदलणार आहेत. केंद्र सरकारने वेळीच आपल्या कार्यपद्धतीत सुधारणा केली नाही आणि प्रादेशिक अस्मितेचा आदर केला नाही, तर आगामी काळात दक्षिणेतील उरलीसुरली सत्ताही हातातून जाण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत. अन्नामलाई यांच्या रूपाने एका मोठ्या नेत्याने घेतलेला हा निर्णय सरकारला येत्या काळात खूप महागात पडणार असल्याचे चित्र आहे.

## सावळदबारा येथे गुलाबराव पाटील कोलते यांच्या हस्ते करण्यात आले वृक्षारोपण



**सावळदबारा प्रतिनिधी.:** सावळदबारा येथे जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण करण्यात आले, भारतीय जनता पार्टीचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते यांनी दि. 5 जून रोजी जागतिक पर्यावरण दिन निमित्त सावळदबारा येथे वृक्षारोपण करण्यात आले यावेळी भाजपचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते,देवराव इगळे, सखाराम कोते,एकनाथ सपाटे,सुकलाल चव्हाण,समीर तडवी,समाधान टिकारे,योगेश साळुंके आदी होते

# शिवराज्याभिषेक : स्वाभिमानाच्या सूर्याचा सुवर्णोदय



भारतीय इतिहासाच्या विशाल आकाशात अनेक राजे उदयास आले, अनेक साम्राज्ये उभी राहिली आणि काळाच्या ओघात लयालाही गेली; परंतु काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की ती केवळ इतिहास घडवत नाहीत, तर इतिहासालाच नवी दिशा देतात. छत्रपती शिवाजी महाराज हे असेच एक युगप्रवर्तक व्यक्तिमत्त्व! त्यांचा राज्याभिषेक हा केवळ एका राजाचा सिंहासनारोहण सोहळा नव्हता, तर तो गुलामीच्या अंधारात हरवलेल्या स्वाभिमानाचा सुवर्णोदय होता. ६ जून १६७४ रोजी रायगडाच्या पवित्र भूमीवर घडलेला शिवराज्याभिषेक हा महाराष्ट्राच्या नव्हे, तर संपूर्ण भारताच्या आत्मसन्मानाचा मंगल सोहळा ठरला.

ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशीचा तो सुवर्णक्षण! रायगडाच्या राजसभेत इतिहास नव्या तेजाने उजळून निघाला होता. सह्याद्रीच्या उंच शिखरांवरून उगवणाऱ्या सूर्यालाही त्या दिवशी जणू आपल्या तेजाचा अभिमान वाटत नव्हता, कारण रायगडावर एक असा तेजस्वी सूर्य विराजमान होणार होता, ज्याच्या कर्तृत्वाच्या प्रकाशाने संपूर्ण भारतभूमी उजळून निघाली होती.

राज्याभिषेकाच्या मंगलक्षणी छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वरूप विलक्षण तेजोमय भासत होते. मस्तकी रत्नजडित मुकुट, कपाळी केशरी गंधाचा तेजस्वी टिळा, अंगावर भरजरी राजवस्त्रे, गळ्यात मोत्यांचे आणि रत्नांचे हार, कमरेला भवानी तलवार आणि मुखमंडलावर सिंहासारखे तेज! त्यांच्या डोळ्यांत करुणा आणि कठोरता यांचा अद्भुत संगम दिसत होता. ते डोळे रयतेसाठी प्रेमाने ओलावलेले होते, तर अन्यायाविरुद्ध वज्रासारखे कठोर होते.

महाराजांचे व्यक्तिमत्त्व त्या दिवशी केवळ एका राजाचे नव्हते; ते स्वराज्याच्या मूर्त स्वरूपाचे दर्शन घडवत होते. त्यांच्या चेहऱ्यावर विजयाचा गर्व नव्हता, तर प्रजेच्या कल्याणाची जबाबदारी स्वीकारणाऱ्या लोकनायकाचे गांभीर्य होते. सुवर्ण सिंहासनावर विराजमान झालेल्या शिवरायांचे तेज इतके दिव्य होते की, सभागृहातील प्रत्येक मानकरी आदराने नतमस्तक झाला होता.

रायगडाच्या राजसभेत वेदमंत्रांचा घोष सुरू असताना महाराजांचे व्यक्तिमत्त्व जणू प्राचीन भारताच्या वैभवाचे प्रतीक बनले होते. त्यांच्या अंगी श्रीरामांचे आदर्श नेतृत्व, श्रीकृष्णांची मुत्सद्देगिरी आणि महादेवाचे रौद्र-करुण स्वरूप एकवटल्याचा भास होत होता. त्यांच्या तेजस्वी मुखाकडे पाहताना उपस्थितांना केवळ राजा नव्हे, तर युगपुरुषाचे दर्शन घडत होते.

राजमाता जिजाबाई यांच्या संस्कारांनी घडलेला हा पुत्र त्या दिवशी हिंदवी स्वराज्याचा सार्वभौम छत्रपती म्हणून सिंहासनावर आरूढ झाला. त्यांच्या मुखावर समाधानाचे तेज होते, कारण अनेक वर्षांच्या संघर्षानंतर स्वराज्याला वैधता आणि गौरव प्राप्त झाला होता.

शिवराज्याभिषेकाच्या दिवशी शिवाजी महाराजांचे तेज हे केवळ अलंकारांचे किंवा राजवैभवाचे नव्हते; ते त्याग, पराक्रम, न्यायनिष्ठा, दूरदृष्टी आणि राष्ट्रप्रेम यांच्या दिव्य संगमातून निर्माण झालेले तेज होते. म्हणूनच रायगडावरील त्या सुवर्णक्षणी शिवरायांचे रूप पाहून जनतेच्या मनात एकच भावना जागृत झाली—हा राजा नसून रयतेचा रक्षक, स्वाभिमानाचा दीपस्तंभ आणि स्वराज्याचा साक्षात सूर्य आहे.

आजही शिवराज्याभिषेकाचा विचार मनात आला की, सुवर्णसिंहासनावर विराजमान झालेली ती तेजपुंज मूर्ती डोळ्यांसमोर उभी राहते आणि हृदय अभिमानाने भरून जाते. कारण त्या दिवशी रायगडावर एका राजाचा राज्याभिषेक झाला नव्हता, तर स्वाभिमान, स्वातंत्र्य आणि लोककल्याण या मूल्यांचा राज्याभिषेक झाला होता. "छत्रपती शिवाजी महाराज" हे नाव म्हणूनच आजही तेज, प्रेरणा आणि अस्मितेचे अखंड प्रतीक आहे.

रायगडाच्या कडेकपाऱ्यांत त्या दिवशी इतिहासाने स्वतःचा श्वास रोखून धरला होता. सह्याद्रीच्या उंच शिखरांनी जणू आनंदाने मस्तक उंचावले होते. आकाशातील सूर्यही त्या दिवशी अधिक तेजस्वी भासत होता, कारण भूमीवर दुसरा एक सूर्य उदयास येत होता—स्वराज्याचा सूर्य! गडाच्या प्रत्येक दगडातून, प्रत्येक वाऱ्याच्या झुळुकीतून आणि प्रत्येक भगव्या पताकेतून एकच जयघोष घुमत होता—"जय भवानी, जय शिवाजी!"

शिवाजी महाराजांनी स्थापन केलेले स्वराज्य हे केवळ भूभागाचे राज्य नव्हते; ते विचारांचे, संस्कृतीचे, न्यायाचे आणि लोककल्याणाचे राज्य होते. परकीय सत्तांच्या सावलीत दबलेल्या जनतेच्या मनात स्वातंत्र्याची ज्योत पेटविण्याचे कार्य महाराजांनी केले. त्यांनी तलवारीच्या धारेवर स्वराज्य निर्माण केले, पण त्याचा पाया न्याय, नीतिमत्ता आणि लोकहितावर उभारला. म्हणूनच शिवराज्याभिषेक हा एका व्यक्तीच्या यशाचा उत्सव नसून जनतेच्या स्वप्नपूर्तीचा सोहळा होता.

राज्याभिषेकासाठी काशीचे विद्वान पंडित गागाभट्ट यांना निमंत्रित करण्यात आले होते. शास्त्रानुसार सर्व विधी संपन्न करण्यात आले. सुवर्णकलशातील पवित्र जलाने महाराजांचा अभिषेक झाला. वेदमंत्रांच्या मंगल ध्वनीने रायगडाचा परिसर दुमदुमून गेला. त्या क्षणी जणू सह्याद्रीने आपल्या कुशीत वाढवलेल्या पुत्राला सार्वभौमत्वाचा मुकुट अर्पण केला. सिंहासनावर विराजमान होताना शिवराय हे केवळ भोसले घराण्याचे प्रतिनिधी नव्हते; ते संपूर्ण रयतेच्या आशा-आकांक्षांचे प्रतीक बनले होते.

शिवराज्याभिषेकाचे महत्त्व केवळ धार्मिक किंवा राजकीय नव्हते. त्या काळात भारतातील अनेक भाग परकीय सत्तांच्या अधिपत्याखाली होते. हिंदवी स्वराज्याची संकल्पना अनेकांना अशक्य वाटत होती. अशा परिस्थितीत शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक म्हणजे आत्मविश्वासाचा घोष होता. हा सोहळा जगाला सांगणारा होता की, या भूमीतील जनता स्वतःचे राज्य निर्माण करण्यास समर्थ आहे. हा क्षण गुलामीच्या मानसिकतेवर विजय मिळवणारा होता.

रायगडावरील सिंहासन हे केवळ सोन्याचे नव्हते; ते त्याग, पराक्रम, दूरदृष्टी आणि राष्ट्रनिष्ठेच्या अमूल्य रत्नांनी सजलेले होते. त्या सिंहासनावर बसण्यासाठी महाराजांनी बालवयापासून संकटांशी झुंज दिली होती. तोरणा, राजगड, प्रतापगड, सिंहगड यांसारख्या दुर्गांवर फडकणारा भगवा हा त्यांच्या अथक प्रयत्नांचा साक्षीदार होता. अफझलखानाचा वध, पन्हाळगडातून सुटका, आग्र्यातील नजरकैदेतून पलायन आणि असंख्य मोहिमा—या सर्व संघर्षांचे सार म्हणजे शिवराज्याभिषेक!

या सोहळ्यामागे राजमाता जिजाबाई यांचे अथांग योगदान होते. शिवबांच्या मनात स्वराज्याचे बीज रोवणाऱ्या जिजाऊंनी आयुष्यभर एका स्वप्नासाठी तपश्चर्या केली. रायगडावर पुत्राच्या राज्याभिषेकाचा क्षण पाहताना त्यांच्या डोळ्यांत समाधानाचे अश्रू दाटले असतील. तो क्षण म्हणजे मातृत्वाच्या संघर्षाचा विजय होता. जिजाऊंच्या संस्कारांचा, धैर्याचा आणि दूरदृष्टीचा तो सर्वोच्च सन्मान होता.

शिवराज्याभिषेकाने महाराष्ट्राला नवे राजकीय अस्तित्व दिले. यानंतर स्वराज्याला अधिकृत सार्वभौम मान्यता मिळाली. प्रशासन अधिक संघटित झाले. न्यायव्यवस्था, महसूल पद्धती, आरमार आणि संरक्षण व्यवस्था अधिक सक्षम झाली. महाराजांनी राज्यकारभारात लोकहिताला सर्वोच्च स्थान दिले. त्यांच्या राज्यात स्त्रियांचा सन्मान, शेतकऱ्यांचे संरक्षण आणि सर्वधर्मसमभाव यांना विशेष महत्त्व होते. त्यामुळे शिवराज्याभिषेक हा सुशासनाच्या नव्या पर्वाचा प्रारंभ ठरला.

आजही शिवराज्याभिषेकाची आठवण मनात अभिमानाचे तरंग निर्माण करते. हा सोहळा आपल्याला स्वाभिमान, राष्ट्रप्रेम आणि कर्तव्यनिष्ठेची प्रेरणा देतो. शिवाजी महाराजांचे कार्य हे काळाच्या मर्यादांपलीकडचे आहे. त्यांच्या राज्याभिषेकाचा संदेश आजही तितकाच जिवंत आहे—अन्यायाविरुद्ध संघर्ष करा, स्वत्व जपा आणि समाजहितासाठी कार्य करा.

शिवराज्याभिषेक हा इतिहासातील एक दिवस नाही; तो भारतीय अस्मितेचा अखंड दीपस्तंभ आहे. रायगडावर प्रज्वलित झालेली ती ज्योत आजही प्रत्येक मराठी मनात, प्रत्येक भारतीयाच्या हृदयात तेजाने प्रज्वलित आहे. स्वराज्याच्या त्या सुवर्णक्षणाने जगाला दाखवून दिले की, दृढनिश्चय, पराक्रम आणि लोककल्याणाची भावना असेल, तर कोणतेही स्वप्न अशक्य नसते.

छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक म्हणजे सह्याद्रीच्या कणखर छातीवर कोरलेला स्वाभिमानाचा सुवर्णलेख! तो इतिहासाचा केवळ अध्याय नाही, तर पिढ्यान्पिढ्या प्रेरणा देणारा अमर महाकाव्याचा मंगल श्लोक आहे. "शिवराज्याभिषेक" हे नाव उच्चारताच आजही मनात अभिमानाचे रणशिंग निनादते आणि हृदयातून सहज उद्गार फुटतात—


*रायगडाच्या कड्यावर स्वाभिमानाचा सूर्य उगवला,*
*सह्याद्रीच्या शिखरांनी आनंदाचा शेला पांघरला।*
*वेदमंत्रांच्या निनादात दुमदुमल्या दिशा दाही,*
*भगव्या ध्वजाच्या साक्षीने दिली स्वराज्याची ग्वाही।*
*सुवर्णसिंहासनी विराजला पराक्रमाचा तेजोदीप,*
*रयतेच्या आशांचा झाला त्या क्षणी मंगल कल्पदीप।*
*शिवराज्याभिषेकाने उजळली भारतभूमी पावन,*
*"जय भवानी, जय शिवाजी!" निनादे आजही गगन॥*
*"जय भवानी! जय शिवाजी!"*

**- सुनिता कावसनकर**
**छत्रपती संभाजीनगर**

# स्वराज्याच्या संकल्पनेचा ऐतिहासिक आणि चिरंतन विजय

### एक तटस्थ ऐतिहासिक दृष्टिकोन

**जगाच्या इतिहासात काही घटना अशा असतात की त्या केवळ एका राजाच्या किंवा एका राज्याच्या यशापुरत्या मर्यादित राहत नाहीत. त्या एका समाजाच्या आत्मविश्वासाचे, सामूहिक इच्छाशक्तीचे आणि भविष्यदृष्टीचे प्रतीक बनतात. ६ जून १६७४ रोजी रायगडावर झालेला छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक हा भारतीय इतिहासातील असा एक महत्त्वपूर्ण आणि युगप्रवर्तक क्षण मानला जातो. हा दिवस आज शिवराज्याभिषेक दिन, शिवस्वराज्य दिन आणि शिवशक प्रारंभ दिन म्हणून आदरपूर्वक स्मरण केला जातो.**



सह्याद्रीच्या कुशीत वसलेला रायगड त्या दिवशी केवळ राजधानी नव्हता; तो एका ऐतिहासिक परिवर्तनाचा साक्षीदार होता. अनेक वर्षांच्या प्रयत्नांनंतर उभे राहिलेले स्वराज्य या राज्याभिषेकामुळे अधिकृत आणि सार्वभौम स्वरूपात जगासमोर प्रस्थापित झाले. इतिहासाच्या दृष्टीने हा प्रसंग केवळ राजकीय नव्हता; तो वैधता, स्थैर्य आणि संघटित शासनव्यवस्थेच्या स्थापनेचा महत्त्वपूर्ण टप्पा होता.

"स्वराज्य" ही संकल्पना या घटनेचे केंद्रस्थान आहे. स्वराज्य म्हणजे केवळ सत्ता नव्हे, तर लोकांच्या हिताला प्राधान्य देणारी, न्यायावर आधारलेली आणि उत्तरदायित्वाची जाणीव असलेली शासनव्यवस्था. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा अभ्यास करताना लोककल्याण, प्रशासनातील शिस्त, न्यायनिष्ठा, सुरक्षेची जाणीव आणि दूरदृष्टी ही वैशिष्ट्ये विशेषत्वाने अधोरेखित होतात. त्यामुळे त्यांचे कार्य इतिहासापुरते मर्यादित न राहता नेतृत्व आणि सुशासनाच्या अभ्यासासाठीही महत्त्वाचे ठरते.

राज्याभिषेकानंतर सुरू झालेला शिवशक हा स्वतंत्र कालगणनेचा प्रारंभ होता. कालगणना ही केवळ वेळ मोजण्याची पद्धत नसून सांस्कृतिक आणि राजकीय ओळखीचे प्रतीक असते. शिवशकाने स्वराज्याच्या स्वतंत्र अस्तित्वाची आणि आत्मभानाची जाणीव अधिक दृढ केली.

रायगड आजही त्या ऐतिहासिक क्षणाची स्मृती जपून उभा आहे. त्याचे तट, दरवाजे आणि प्रांगणे इतिहासाच्या असंख्य कथा सांगतात. रायगड आपल्याला स्मरण करून देतो की महान कार्ये केवळ सामर्थ्याने घडत नाहीत; त्यासाठी ध्येय, संघटनशक्ती, संयम आणि लोकांचा विश्वास आवश्यक असतो.

साहित्यिक दृष्टीने पाहिले तर शिवराज्याभिषेक हा आशा, धैर्य आणि स्वाभिमान यांचा उत्सव वाटतो. तो संघर्षातून साकार झालेल्या यशाची आणि जनतेच्या आकांक्षांना मिळालेल्या स्वरूपाची कथा सांगतो.

रायगडाच्या शिखरावर इतिहास नव्याने फुलला,
जनतेच्या विश्वासातून स्वराज्याचा सूर्य उगवला।
संघर्षांच्या प्रदीर्घ वाटा स्वप्नांच्या किनाऱ्याला मिळाल्या,
आणि एका युगाच्या धैर्याला अमर ओळख लाभली।

आजच्या काळात शिवराज्याभिषेक दिनाचे महत्त्व केवळ ऐतिहासिक स्मरणापुरते नाही. तो न्याय, उत्तरदायित्व, लोकहित, स्वाभिमान आणि सुशासन यांसारख्या कालातीत मूल्यांची आठवण करून देतो. बदलत्या जगातही ही मूल्ये तितकीच महत्त्वाची आहेत.

म्हणूनच ६ जून १६७४ हा दिवस केवळ एका राज्याभिषेकाचा दिवस नाही; तो लोकविश्वास, सुशासन, सांस्कृतिक आत्मभान आणि राष्ट्रनिर्मितीच्या आदर्शांचा तेजस्वी उत्सव आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक हा भारतीय इतिहासातील एक उज्ज्वल अध्याय असून, त्यातून व्यक्त होणारी मूल्ये आजही प्रेरणा, अभ्यास आणि चिंतनाचा अखंड स्रोत आहेत.

**पी. एम. धुमाळ,**
**छत्रपती संभाजीनगर**

# जिल्हा परिषद मुख्यालयासह फुलंब्री व ग्रामीण भागात विविध उपक्रम; पर्यावरण संवर्धनाचा संदेश

हिंदू प्रकाशवार्ता, प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** , जागतिक पर्यावरण दिनानिमित्त जिल्हा परिषद प्रशासनाच्या वतीने जिल्हाभर विविध ठिकाणी वृक्षारोपण, जनजागृती मोहीम, विशेष ग्रामसभा आणि स्वच्छता उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. पर्यावरण संरक्षण, जलवायू बदलांवरील उपाययोजना आणि लोकसहभाग वाढविण्याच्या उद्देशाने राबविण्यात आलेल्या या उपक्रमांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

जिल्हा परिषद मुख्यालयात जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश गलांडे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी उपाध्यक्ष जितेंद्र जैस्वाल, भाजप जिल्हाध्यक्ष संजय खंबायते, पंचायत समिती सभापती कल्याण गायकवाड, जिल्हा परिषद सदस्यांसह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. वाढते प्रदूषण, जंगलतोड आणि हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर वृक्षलागवड व संवर्धनाचे महत्त्व यावेळी अधोरेखित करण्यात आले.

चौकट,

फुलंब्रीतही वृक्षलागवड

जिल्हाधिकारी विनय गौडा व जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके यांनी फुलंब्री तहसील कार्यालयात विविध योजनांचा आढावा घेतल्यानंतर मुर्शिदाबाद



वाडी येथे ग्रामपंचायत व प्राथमिक शाळा परिसरात वृक्षारोपण केले. यावेळी उपविभागीय अधिकारी नीलम बाफना, पूजा वंजारी, गटविकास अधिकारी प्रसाद खेडेकर, तहसीलदार योगिता खटावकर यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

'स्वच्छ गाव, सुरक्षित जलवायू' मोहिमेला प्रतिसाद

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग आणि स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत १ ते ५ जूनदरम्यान 'स्वच्छ गाव, सुरक्षित जलवायू' ही विशेष मोहीम राबविण्यात आली. घनकचरा व्यवस्थापन, पर्यावरण संवर्धन, कचरा वर्गीकरण, कंपोस्ट निर्मिती, जनजागृती फेऱ्या आणि विशेष ग्रामसभांच्या माध्यमातून नागरिकांमध्ये स्वच्छता व पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण करण्यात आली. ग्रामस्थ, महिला बचत गट, युवक आणि स्वयंसेवी संस्थांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदविला. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम., अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके, उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. ओमप्रसाद रामावत आणि कार्यकारी अभियंता विजय वाघ यांनी नागरिकांना पर्यावरण संवर्धनासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन केले.

# खत विक्रीतील नव्या ऑनलाइन प्रणालीचे पोस्टर अनावरण



हिंदू प्रकाशवार्ता/ प्रतिनिधी

**सोयगाव, दि.५ जून :** शेतकऱ्यांना खत वितरण प्रक्रिया अधिक पारदर्शक, सुलभ व कार्यक्षम करण्याच्या उद्देशाने शासनाने सुरू केलेल्या "Framework for Fertilizer Sale (FFS)" या ऑनलाइन प्रणालीबाबत जनजागृती करण्यासाठी पंचायत समिती सोयगाव येथे शुक्रवारी पोस्टरचे अनावरण करण्यात आले.यावेळी पंचायत समितीचे सभापती उत्तम चव्हाण यांच्या हस्ते खत बुकिंग व खरेदी प्रक्रियेबाबतच्या माहितीपर पोस्टरचे अनावरण करण्यात आले. या प्रसंगी उपस्थितांना नव्या ऑनलाइन खत बुकिंग व खरेदी प्रणालीची सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच या प्रणालीमुळे खत वितरणातील पारदर्शकता वाढून शेतकऱ्यांना वेळेत व सुलभ पद्धतीने खत उपलब्ध होण्यास मदत होणार असल्याचे सांगण्यात आले.

कार्यक्रमात FFS ॲपच्या कार्यपद्धती, फायदे आणि अंमलबजावणीबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तालुक्यातील सर्व गावांमध्ये कृषी सेवा केंद्रांच्या माध्यमातून तसेच उपकृषी अधिकारी, सहायक कृषी अधिकारी व विस्तार अधिकारी (कृषी) यांच्या माध्यमातून या प्रणालीची व्यापक जनजागृती सुरू असल्याची माहिती पंचायत समितीचे कृषी अधिकारी संतोष भालेराव यांनी दिली.

# समर्पण फाऊंडेशन सोयगाव तर्फे सोयगाव पोलीस स्टेशनमध्ये निसर्गस्नेही स्वागत आणि पर्यावरण दिनाचा संदेश



हिंदू प्रकाशवार्ता/ प्रतिनिधी

**सोयगाव,दि.५ जून :** ५ जून जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून 'समर्पण फाऊंडेशन'तर्फे सोयगाव पोलीस स्टेशनमध्ये एक अत्यंत प्रेरणादायी आणि अभिनव उपक्रम राबवण्यात आला.

सोयगाव पोलीस ठाण्याचे नवीन प्रभारी अधिकारी म्हणून आलेले सहाय्यक पोलीस निरीक्षक दिनकर शिवाजीराव गोरे यांची नियुक्ती झाली आहे.त्यांच्या या नवीन नियुक्तीबद्दल 'समर्पण फाउंडेशन'च्या वतीने त्यांचे हार्दिक स्वागत करण्यात आले.त्यांना फुलांचे नव्हे तर निसर्गाचे' प्रतीक म्हणून एक रोप देऊन स्वागत करण्यात आले. त्यांच्या भावी वाटचालीस फाउंडेशनतर्फे खूप खूप शुभेच्छा दिल्या.याच आनंदाच्या क्षणी,'जागतिक पर्यावरण दिना' निमित्त समर्पण फाउंडेशन आणि सोयगाव पोलीस स्टेशन यांच्या संयुक्त विद्यमाने,पोलीस स्टेशन हद्दीतील परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.पोलीस अधिकारी,कर्मचारी आणि फाउंडेशनचे सदस्य यांनी एकत्र येऊन कडुलिंब आणि चिंचेचे रोपे लावून पर्यावरण रक्षणाचा संदेश दिला.तर यावेळी समर्पण फाऊंडेशनचे संपूर्ण टीम उपस्थित होते.

# कमांडर विनोद नरवडे यांच्या वाढदिवसानिमित्त इंडियन कॅडेट फोर्स तर्फे रक्तदान शिबीर



**छत्रपती संभाजीनगर:**"इंडियन कँडेट फोर्स" तर्फे " कमांडर विनोद नरवडे यांच्या 55 व्या वाढदिवसानिमित्त निमित्त दरवर्षी प्रमाणे यावर्षी 5 जून रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते, यात 51 रक्तदात्यांनी पैठणगेट जवळील आय. सी. एफ. कार्यालय येथे रक्तदान केले. यात सर्व आय. सी. एफ. परिवार केले. विशेष म्हणजे प्रणाली खैरनार व राकेश खैरनार यांनी जोडीने रक्तदान करून शिबिरास सुरुवात केली. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी जगदीश खैरनार? विजय पाटील, शोएब पठाण, अशोक अंधारे, सचिन वेताळ, किशोर नावकर, राहुल अहिरे, सुरज सुलाने, चेतन सरवदे, बबलू त्रिवेदी, डॉ.दयानंद कांबळे, प्रवीण जैस्वाल, किशोर नरवडे, अनिल भवर, प्रदीप शेंडगे, पंकज वाडेकर, विशाल काकडे, संतोष राठोड, विनोद विभुते, आदित्य नरवडे, शैलेश नरवडे, पृथ्वीराज नरवडे आदींनी परिश्रम घेतले.

# 18 वर्षांनंतर राजा बाजार जैन मंदिरात आचार्य सिद्धांत सागरजी महाराजांचे मंगल आगमन

हिंदू प्रकाशवार्ता, प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** जैन समाजासाठी अत्यंत आनंददायी आणि ऐतिहासिक क्षण ठरणारा योग तब्बल १८ वर्षांनंतर लाभला असून परम पूज्य आचार्य श्री १०८ सिद्धांत सागरजी महामुनिराज (११ पिच्छी) ससंघ यांचे राजा बाजार दिगंबर जैन मंदिरात ६ जून रोजी मंगल आगमन होत आहे. या निमित्ताने तीन दिवसीय धार्मिक, आध्यात्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.



आचार्य श्री सकाळी ६ वाजता देशमुख नगर येथून मंगल विहारास प्रारंभ करणार असून मोढा नाका येथे त्यांचे स्वागत होईल. किराणा चौडी चौकात भव्य गुरु-मिलन सोहळ्यानंतर सकाळी ७.३० वाजता राजा बाजार जैन मंदिरात मंगल प्रवेश होणार आहे. यावेळी गणिनी आर्यिका श्री विमलप्रभा माताजी आणि आर्यिका श्री वीहेनश्री माताजी ससंघ यांचेही मंगल मिलन होणार आहे.

६ जून रोजी पंचामृत अभिषेक, मंगल प्रवचन आणि आहारचर्या, तर ७ जून रोजी श्री पार्श्वनाथ विधान, अभिषेक व प्रवचनाचे आयोजन करण्यात आले आहे. ८ जून रोजी आचार्य श्री विनम्र सागरजी गुरुदेव यांच्या २४ व्या दीक्षा महोत्सवानिमित्त गुरु पूजन व विनयांजली सभेचे आयोजन करण्यात आले आहे.

भक्ती, संगीत आणि अध्यात्माच्या वातावरणात होणाऱ्या या त्रिदिवसीय महोत्सवात समाजबांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन धर्मलाभ घ्यावा, असे आवाहन पंचायत अध्यक्ष महावीर पाटणी, सचिव प्रकाश अजमेरा व विश्वस्त मंडळाने केले आहे.

# एमजीएममध्ये जागतिक पर्यावरण दिन संपन्न

हिंदू प्रकाशवार्ता, प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर, :** महात्मा गांधी मिशन विद्यापीठात जागतिक पर्यावरण दिनानिमित्त चिंतनगाह परिसर येथे वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. 'इन्स्पायर्ड बाय नेचर. फॉर क्लायमेट. फॉर अवर फ्यूचर' ही यावर्षीची पर्यावरण दिनाची थीम आहे. आज या कार्यक्रमात सहभागी झालेल्या मान्यवरांनी 'पर्यावरण संवर्धन आणि निरोगी जीवनशैली'चा संदेश देत सर्वांनी पर्यावरणाच्या रक्षणासाठी कार्यरत राहण्याचा संकल्प केला.



या कार्यक्रमास डॉ.आर. आर.देशपांडे, एमजीएम विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, जवाहरलाल नेहरू अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.विजया मुसांडे, एमेरिटस प्राध्यापक डॉ. के. एम. जाधव, विभागप्रमुख डॉ.विजया प्रधान, प्रविण देशमुख, सर्व संचालक, प्राचार्य, प्राध्यापक, विभागप्रमुख, विद्यार्थी व सर्व सबंधित उपस्थित होते.

आज केलेले वृक्षारोपण हे 'सिटी फार्मिंग' या शहरी भागातील सेंद्रिय कचऱ्याचे व्यवस्थापन आणि हरित पर्यावरण निर्मिती यांची सांगड घालणारी अभिनव संकल्पना आहे. या पद्धतीत घरगुती जैविक कचऱ्यापासून कंपोस्ट तयार करून त्याच ड्रममध्ये विविध प्रकारची झाडे, फुले, औषधी वनस्पती आणि भाजीपाला लागवड केली जाते. यामुळे कचऱ्याचे पुनर्वापर, प्रदूषण कमी करणे, कार्बन शोषण वाढवणे आणि शहरांमध्ये हिरवळ निर्माण करणे शक्य होते. सिटी फार्मिंगमुळे स्वच्छ, सुंदर आणि शाश्वत पर्यावरण निर्मितीस हातभार लागतो.

एमजीएम विद्यापीठ राबवत असलेले उपक्रम हे संयुक्त राष्ट्राच्या शाश्वत विकास उद्दिष्टांशी सुसंगत असून हवामान बदलाच्या परिणामांना कमी करण्यासाठी आणि पर्यावरण संवर्धनाला चालना देण्यासाठी कार्यरत आहेत. वृक्षारोपण, नदी संवर्धन आणि स्वच्छता मोहिमांद्वारे आम्ही हरित, स्वच्छ आणि शाश्वत भविष्यासाठी योगदान देत आहोत.

नदी संवर्धन आणि पुनरुज्जीवन ही केवळ पर्यावरणाची गरज नसून आपल्या भविष्यासाठीची सामूहिक जबाबदारी आहे. नदी स्वच्छता मोहिमांमध्ये सक्रिय सहभाग, नदीतील प्रदूषण कमी करण्यासाठी सर्वांनी समूहिकपणे प्रयत्न करणे तसेच कचऱ्याचे पुनर्वापराद्वारे सौंदर्यात रूपांतर करत डस्टबिनपासून आकर्षक फुलदाण्या तयार करणे अशा उपक्रमांद्वारे आपण पर्यावरण संवर्धनाला हातभार लावत आहोत. शहराचा एक जबाबदार घटक म्हणून आम्ही या उपक्रमाचा अभिमानाने भाग आहोत आणि स्वच्छ, सुंदर व शाश्वत भविष्यासाठी कटिबद्ध आहोत, असा संदेश मान्यवरांनी यावेळी दिला.

# अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या माफियांवर पोलिसांची धडक कारवाई; हायवा ट्रकसह दोन ट्रॅक्टर जप्त

## वडोदबाजार पोलिसांचे दोन वेगवेगळ्या ठिकाणी छापे; लाखोंचा मुद्देमाल हस्तगत केल्याने वाळू तस्करांचे धाबे दणाणले

**वडोदबाजार :** अवैध धंद्यांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी पोलीस प्रशासनाच्या वतीने सध्या एक विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेत अंतर्गत वडोदबाजार पोलिसांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीच्या आधारे दोन वेगवेगळ्या ठिकाणी धडक छापे टाकले आहेत. या कारवाई दरम्यान अवैध वाळू उपसा व चोरटी वाहतूक करणारा एक हायवा ट्रक आणि दोन ट्रॅक्टर जप्त करण्यात आले आहेत. या दोन्ही कारवायांमध्ये एकूण लाखों रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.



कारवाई दरम्यान हायवा वाहन आणि अवैध वाळू असा लाखो रुपयांचा मुद्देमाल जागीच जप्त करून संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सचिन क्षीरसागर करत आहेत.

दुसरी कारवाई वडोदबाजार अंतर्गत येणाऱ्या बाबरा परिसरात करण्यात आली. खात्रीशीर माहितीच्या आधारे पोलिसांनी धाड टाकून अवैध वाळूची चोरटी वाहतूक करणारे दोन ट्रॅक्टर पकडले. या धडक कारवाईत दोन्ही ट्रॅक्टर व वाळू असा मोठा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या गुन्ह्याचा पुढील तपास श्रेणी पोलीस उपनिरीक्षक शंकर चव्हाण हे करत आहेत.

सदर यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत स्वामी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी पुजा नांगरे यांच्या सक्षम मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत सहाय्यक पोलीस निरीक्षक विजयसिंग जोनवाल, पोलीस उपनिरीक्षक सचिन क्षीरसागर, श्रेणी पोलीस उपनिरीक्षक शंकर चव्हाण, सहाय्यक फौजदार नागलोद, पोलीस हवालदार खाकरे, वाघ, तसेच पोलीस अंमलदार मोरे आणि सपकाळ यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

# विशेष ग्रामसभेत मुख्याध्यापक यांचा सेवा गौरव सत्कार

**गंगापूर :** तालुक्यातील जोगेश्वरी येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक यशवंत नारायण आवारे यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त एक विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.त्यांच्या प्रदीर्घ आणि समर्पित सेवापूर्तीबद्दल ग्रामपंचायत जोगेश्वरी यांच्या वतीने त्यांचा शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन भावपूर्ण सत्कार करण्यात आला.



या प्रसंगी माजी शालेय अध्यक्ष तथा कामगार सेना गंगापूरचे तालुका प्रमुख हरिदास चव्हाण, ग्रामपंचायत सदस्य व राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विलास सौदागर तसेच इतर सदस्यांनी आपले मनोगत व्यक्त करून मुख्याध्यापकांच्या भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

या सोहळ्याला ग्रामपंचायत सदस्य प्रभाकर काजळे, तंटामुक्तीचे अध्यक्ष उद्धव काजळे, ग्रामपंचायत कर्मचारी मनोहर लोहकरे, राहुल जोशी, सतिष देवकर, अशपाक बेग, दत्तू काजळे, दत्तू कर्डिले, किशोर गांगवे, कैलास गांगवे, सुनिल निर्मळ, मोकळे, तसेच सोनताई शिंदे, छायाताई खाजेकर, मंगलताई ढोकळे आणि कलाबाई गायकवाड यांच्यासह अनेक नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन आणि उपस्थितांचे स्वागत ग्रामविस्तार अधिकारी स्वप्नील घडमोडे यांनी केले, तर शेवटी प्रशासक अशोकरावजी घोडके आप्पा यांनी सर्वांचे आभार मानले.

# प्राचीन वारसा जपण्यासाठी सोयगाव तालुक्यातील गलवाडा(अ) ग्रामस्थ सरसावले; मारुती मंदिराच्या जीर्णोद्धाराचा निर्धार

हिंदू प्रकाशवार्ता/ प्रतिनिधी

**सोयगाव,दि.५ जून :** छत्रपती संभाजीनगर जिल्हा हा ऐतिहासिक,धार्मिक आणि पर्यटन स्थळांसाठी जगभर प्रसिद्ध आहे.वेरूळची कैलास लेणी,अजिंठा लेणी आणि घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग यांसारख्या जागतिक दर्जाच्या वारशासोबतच सोयगाव तालुक्यातही अनेक ऐतिहासिक आणि प्राचीन स्थळांचा ठेवा जपला गेला आहे.याच तालुक्यातील गलवाडा (अ) हे गाव आपल्या रहस्यमय इतिहासामुळे आणि सांस्कृतिक वारशामुळे विशेष ओळख निर्माण करत आहे.

अजिंठा डोंगररांगांच्या परिसरात वसलेल्या या गावाजवळ श्री रुद्रेश्वर महादेव लेणी तसेच वेताळवाडी राणीचा किल्ला ही ऐतिहासिक स्थळे आहेत.गावात विविध ठिकाणी खोदकामादरम्यान प्राचीन वस्तू,मूर्ती आणि धार्मिक अवशेष सापडल्याच्या घटना घडल्या आहेत.काही वर्षांपूर्वी प्रभू शंकराची



पिंड आणि नंदीची मूर्ती आढळली होती,तर त्यानंतर विठ्ठल-रुक्मिणीच्या प्राचीन मूर्तीही सापडल्या. त्यामुळे गावातील ग्रामदैवत श्री मारुती मंदिराचे ऐतिहासिक महत्त्व अधिक अधोरेखित झाले आहे.

या पार्श्वभूमीवर ९ मे २०२६ रोजी गावातील नागरिकांची ऐतिहासिक बैठक पार पडली. बैठकीत ग्रामदैवत असलेल्या श्री मारुती मंदिराच्या जीर्णोद्धाराचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला.गावाच्या प्राचीन वारशाला साजेसे हेमाडपंथी शैलीतील दगडी,भव्य आणि कलात्मक मंदिर उभारण्याचा संकल्प ग्रामस्थांनी केला आहे.

भावी पिढीला आपल्या संस्कृतीचा आणि इतिहासाचा ठेवा जतन करून देण्याच्या उद्देशाने गावातील प्रत्येक कुटुंब या उपक्रमात सहभागी झाले आहे.मंदिर उभारणीसाठी अंदाजे ३० ते ३५ लाख रुपयांचा खर्च अपेक्षित असून,आवश्यक निधीपैकी सुमारे ९० टक्के निधी जमा झाल्यानंतर प्रत्यक्ष बांधकामाला सुरुवात करण्याचे नियोजन आहे.

ग्रामस्थांनी शेतकरी,व्यापारी,नोकरदार,सामाजिक व राजकीय क्षेत्रातील व्यक्तींना मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी सहकार्याचे आवाहन केले आहे.प्राचीन संस्कृती आणि धार्मिक वारसा जतन करण्यासाठी अशा ग्रामदैवतांच्या मंदिरांचे संवर्धन करणे ही काळाची गरज असल्याचे मत गावकऱ्यांनी व्यक्त केले.

# मराठवाड्यातील इनामदारांना मालकी हक्क मिळावा; भव्य 'एक दिवसीय धरणे आंदोलन' संपन्न

**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाड्यातील हजारो इनामदार व भोगवटदार कुटुंबांना जमिनीच्या मालकी हक्काचा न्याय मिळावा आणि प्रस्तावित 'महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन अधिनियम २०२६' अंतर्गत संपूर्ण राज्यात समान न्याय लागू व्हावा, या मागणीसाठी आज ५ जून २०२६ रोजी विभागीय महसूल आयुक्त कार्यालयासमोर एक दिवसीय धरणे आंदोलन यशस्वीपणे पार पडले. 'भटके विमुक्त दशनाम गोसावी समाज परिषद, महाराष्ट्र राज्य' आणि 'मराठवाडा इनाम जमीन हक्क परिषद' यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात संपूर्ण मराठवाड्यातून मोठ्या संख्येने समाजबांधव व इनामदार उपस्थित होते.

कायद्यात मराठवाड्याला वगळल्याने तीव्र संताप व्यक्त होत असताना आंदोलनादरम्यान विभागीय आयुक्तांना देण्यात आलेल्या निवेदनात संघटनांनी स्पष्ट केले की, राज्य शासनाच्या नवीन प्रस्तावित अधिनियमामध्ये महाराष्ट्रातील इतर भागांतील धार्मिक व धर्मादाय संस्थांच्या इनाम जमिनींसाठी विविध सवलती आणि हक्कांची तरतूद करण्यात आली आहे. मात्र, या कायद्याच्या कक्षेतून मराठवाड्यातील मूळ इनामदारांना वगळण्यात आले असून, हा मराठवाड्यावर झालेला गंभीर अन्याय आहे. हैदराबाद संस्थानाच्या विलीनीकरणाच्या काळात मोठा त्याग करूनही, मराठवाड्यातील इनामदारांना आजतागायत जमिनीचा मालकी हक्क मिळालेला नाही, अशी खंत आंदोलकांनी व्यक्त केली.



कायद्यात एकसूत्रीपणा आणण्याची मागणी होत असून १९६० च्या दशकात मराठवाड्यातील काही देवस्थान इनाम जमिनी (खिदमत माश) नाममात्र नजराणा घेऊन 'वर्ग १' मध्ये रूपांतरित करण्यात आल्या होत्या, तसेच काही जमिनी अंशतः वर्ग १ मध्ये आहेत. याशिवाय, २०२५ मध्ये राज्य शासनाने इतर काही जिल्ह्यांमध्ये तत्कालीन जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत काही इनाम जमिनी खालसा करून संबंधितांना दिलासा दिला आहे. याच धर्तीवर, संपूर्ण महाराष्ट्र राज्यात देवस्थान इनाम जमिनीच्या संदर्भात एकसूत्रीपणा आणून कायद्याच्या मसुद्यात आवश्यक सुधारणा करावी, अशी मागणी आजच्या आंदोलनाद्वारे करण्यात आली.

भूमाफियांवर कठोर कारवाईची मागणी संघटनांनी प्रस्तावित 'महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन अधिनियम २०२६' चे स्वागत केले आहे. मात्र, या कायद्यात दुरुस्ती करून मराठवाड्याचा समावेश करावा आणि इनाम जमिनींवर बेकायदेशीर ताबा मिळविणाऱ्या भूमाफियांवर कठोर कारवाई करून बोगस कागदपत्रे रद्द करावीत, अशी मागणी करण्यात आली.

विविध समाज घटकांचा सक्रिय पाठिंबा आज झालेल्या या धरणे आंदोलनाला मराठवाड्यातील विविध पुरोहित, पुजारी आणि सामाजिक संघटनांनी घटनास्थळी येऊन जाहीर पाठिंबा दिला. यामध्ये प्रामुख्याने - भटक्या विमुक्त दशनाम गोसावी समाज परिषद (बीड),अखिल भारतीय दशनाम गोसावी समाज उन्नती मंडळ (परभणी), दशनाम गोसावी समाज उत्कर्ष मंडळ (लातूर),दशनाम गोसावी संघ (धाराशिव), दशनाम गोसावी समाज संस्था (जालना), नांदेड जिल्हा गोसावी समाज संघ, दशनाम गोसावी समाज मराठवाडा महासंघ दशनाम गोसावी समाज संस्था (छत्रपती संभाजीनगर), दशनाम गोसावी समाज सेवा (हिंगोली)

ब्राह्मण पुरोहित पुजारी महासंघ (बीड), जैन पुजारी पुरोहित महासंघ

अखिल गुरव समाज संघटना, वैष्णव बैरागी संघ, नाथपंथी गोसावी संघटना मराठा समाज देवस्थान पुजारी महासंघ, तसेच गोसावी सेना महाराष्ट्र राज्य यांचा समावेश होता.

मागण्या मान्य न झाल्यास तीव्र संघर्षाचा इशारा मराठवाड्यातील इनामदारांना या नवीन कायद्यांतर्गत तातडीने समान न्याय न मिळाल्यास, आगामी काळात राज्यभर तीव्र आंदोलन, उपोषण व लोकशाही मार्गाने मोठा संघर्ष उभारण्यात येईल, असा इशारा राज्य समन्वयक ओमप्रकाश गिरी, ॲड. राजेंद्र दळवी, दत्ता महाराज गिरी, ॲड. जगदेव गिरी साहेब, संपत्ती पुरी महाराज आणि डॉक्टर मकरंद गिरी सर यांनी आंदोलनादरम्यान प्रशासनाला दिला.

# फर्दापूर पोलीस ठाण्याचे नवनियुक्त सहाय्यक पोलीस निरीक्षक सुधीर भाऊसाहेब मोटे याचा सत्कार



सावळदबारा प्रतिनिधी : फर्दापूर पोलीस ठाण्याचे नवनियुक्त सहाय्यक पोलीस निरीक्षक सुधीर भाऊसाहेब मोटे यांनी नुकताच आपल्या पदाचा कार्यभार स्वीकारला आहे. कार्यभार स्वीकारल्यानंतर दि. 4 जून रोजी सावळदबारा येथे आल्यानंतर यावेळी भाजपचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते यांनी त्यांचा सत्कार केला,यावेळी सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक एस. सी. पाटील, मिरखा तडवी, शिवदास गोपाळ, संतोष उबाळे, कृष्णा इंगळे, जगदीश सोनवणे तसेच सावळदबारा पोलीस पाटील विलास आप्पा कुल्ली, डॉ. जफ्फर सय्यद, मनोज बुढाळ, मधुकर पुजारी, संजय आप्पा काळे,रवि कोळपे,आदी होते

# रविवारी 'फिट इंडिया संडेज' ऑन सायकल रॅली उपक्रम

**छत्रपती संभाजीनगर :** पोलिस आयुक्तालयाच्या पुढाकाराने भारतीय क्रीडा प्राधिकरण (साई), राष्ट्रीय उत्कृष्टता केंद्र (एनसीओई), सीआयएसएफ , ईएसआयसी, सायकलिंग असोसिएशन, सायकलिस्ट फाउंडेशन तसेच इतर सहकारी संस्थांच्या सहकार्याने रविवार, ७ जून २०२६ रोजी 'फिट इंडिया संडेज ऑन सायकल' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यक्रमास सकाळी ०६.०० वाजता पोलिस ग्राउंड येथून हिरवा झेंडा दाखवून रॅलीस सुरुवात करण्यात येणार आहे. सायकल रॅलीचा मार्ग पानचक्की, लॉ कॉलेज, लिटल फ्लॉवर स्कूल, मिल कॉर्नरमार्गे पुन्हा पोलिस आयुक्त कार्यालय, पोलिस ग्राउंड असा राहील.

या उपक्रमाचा उद्देश नागरिकांमध्ये नियमित व्यायाम, तंदुरुस्ती आणि सायकलिंगबाबत जनजागृती निर्माण करणे तसेच निरोगी व सक्रिय जीवनशैलीला प्रोत्साहन देणे हा आहे. कार्यक्रमात खेळाडू, फिटनेस प्रेमी, विद्यार्थी, शासकीय अधिकारी, सुरक्षा दलाचे जवान, सायकलपटू तसेच नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.

सायकल रॅलीनंतर सहभागींसाठी विविध मनोरंजनात्मक खेळ, फिटनेस चॅलेंजेस आणि सहभागात्मक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच सर्व सहभागींसाठी अल्पोपहार व पिण्याच्या पाण्याची व्यवस्थाही संयोजकांच्या वतीने करण्यात आली आहे.

हा कार्यक्रम फिट इंडिया अभियान अंतर्गत आयोजित करण्यात येत असून निरोगी, सक्रिय आणि तंदुरुस्त भारत घडविण्याच्या उद्दिष्टाला बळकटी देणारा आहे. सर्व नागरिकांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा, असे असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# जागतिक पर्यावरण दिनानिमित्त सायकल रॅलीस मोठा प्रतिसाद

## महाराष्ट्र पर्यटन व आयआयटीटीएम यांचा उपक्रम




**छत्रपती संभाजीनगर :** जागतिक पर्यावरण दिनानिमित्त ग्वालियर (मध्य प्रदेश) शहरात करण्यात आलेल्या सायकल रॅलीला मोठा प्रतिसाद मिळाला. ५ जून रोजी जागतिक पर्यावरणदिन असतो. या पार्श्वभूमीवर पर्यावरणाचे संरक्षण करणे, हे सर्व समाज घटकांतील लोकांची कार्य आणि जबाबदारी असते, याचाच एक भाग म्हणून महाराष्ट्र पर्यटन व आयआयटीटीएम ग्वालियर यांच्या संयुक्त विद्यमाने प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांच्या सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

ग्वालियर येथे महाराष्ट्र पर्यटन विभागाच्या वतीने छत्रपती संभाजी नगर येथील प्रादेशिक पर्यटन उपसंचालक यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यटक मार्गदर्शक प्रशिक्षण चालू आहे. रॅलीमध्ये एकूण ८० जणांनी सहभाग घेतला. आयआयटीटीएम ते इमाम वाडापर्यंत सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. रॅलीमध्ये ग्वालियरच्या माजी महापौर श्रीमती गुप्ता, स्थानिक आमदार, आयआयटीटीएम विभागप्रमुख डॉ. चंद्रशेखर बरूआ, छत्रपती संभाजीनगरचे जिल्हा पर्यटन अधिकारी शेख अजिमुद्दीन यांची प्रमुख उपस्थिती होती. या रॅलीमध्ये एकूण ८० गाईड प्रशिक्षणार्थी सहभागी झाले होते. त्यांनी सायकल चालवून या रॅलीमध्ये सक्रिय सहभाग नोंदविला.

शासनाच्या वतीने सर्व सहभागींना प्रमाणपत्र, त्यासोबत वृक्षवाटप करण्यात आले. सायकल रॅलीचे यशस्वी आयोजनाबद्दल सर्वांचे आभार व्यक्त करण्यात आले. या रॅलीचे नेतृत्व आयआयटीटीएमचे समन्वयक डॉ. चंद्रशेखर बरुआ यांच्या नेतृत्वाखाली व महाराष्ट्र पर्यटन विभागाचे सहायक जिल्ह्य पर्यटन अधिकारी अजिम शेख यांच्या मार्गदर्शनाखाली या सायकल रॅलीचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. सदर प्रशिक्षणार्थींचा सायकल रॅली कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पर्यटन सहायक व समन्वयक डॉ. शिवाजी गायकवाड आणि महाराष्ट्र पर्यटन विभागाने विशेष परिश्रम घेतले.

# भेसळयुक्त व निकृष्ट दर्जाच्या आईस्क्रीमचा साठा जप्त; एमआयडीसी चिखलठाणा येथे अन्न व औषध प्रशासनाची मोठी कारवाई

## राज महल आईस्क्रीमच्या गोडाऊनवर छापा टाकून अन्न सुरक्षा पथकाने माल केला हस्तगत; नमुने प्रयोगशाळेत पाठवले


**छत्रपती संभाजीनगर :** अन्न व औषध प्रशासनाकडून (एफडीए) शहरात अन्न सुरक्षा व गुणवत्ता तपासणी मोहीम तीव्र करण्यात आली आहे. या मोहिमेंतर्गत छत्रपती संभाजीनगर येथील एमआयडीसी चिखलठाणा परिसरात एक मोठी कारवाई करण्यात आली आहे. येथील एका गोडाऊनवर छापा टाकून संशयित भेसळयुक्त आणि निकृष्ट दर्जाच्या आईस्क्रीमचा मोठा साठा जप्त करण्यात आला आहे. ऐन उन्हाळ्याच्या दिवसांत नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या घटकांवर या कारवाईमुळे मोठी जरब बसली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, एमआयडीसी चिखलठाणा येथील 'राज महल आईस्क्रीम' यांच्या गोडाऊनवर अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने हा छापा टाकला. या गोडाऊनमध्ये साठवण्यात आलेल्या आणि विक्रीसाठी तयार ठेवण्यात आलेल्या आईस्क्रीमच्या गुणवत्तेबाबत प्रशासनाला संशय आला होता. या संशयावरून एफडीएच्या पथकाने तातडीने गोडाऊनची तपासणी सुरू केली.



तपासणीदरम्यान तेथे मोठ्या प्रमाणावर निकृष्ट दर्जाचा साठा आढळून आल्याने अधिकाऱ्यांनी तात्काळ तो जप्त करण्याची कारवाई केली. या प्रकरणात नरेशकुमार मदनलाल जाट यांचे नाव समोर आले आहे.

या धडक कारवाईत गोडाऊनमधून वेगवेगळ्या फ्लेवर्सचे प्रचंड प्रमाणात आईस्क्रीम जप्त करण्यात आले आहे. यामध्ये प्रामुख्याने 'शाही गुलाब' फ्लेवरचे आणि 'मँगो' फ्लेवरचे मोठ्या प्रमाणावर असलेले आईस्क्रीम हस्तगत करण्यात आले आहे. जप्त करण्यात आलेला हा सर्व साठा संशयित भेसळयुक्त किंवा अत्यंत निकृष्ट दर्जाचा असल्याचा प्राथमिक संशय अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. अन्न सुरक्षेच्या नियमांचे उल्लंघन करून ग्राहकांच्या आरोग्याला धोका निर्माण होईल अशा पद्धतीने हा साठा ठेवण्यात आल्याने प्रशासनाने हा माल सील केला आहे. ही संपूर्ण मोहीम अन्न व औषध प्रशासनाचे सहाय्यक आयुक्त डी. व्ही. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच सहआयुक्त एस. आर. करकाळे यांच्या निर्देशानुसार राबविण्यात आली. तर अन्न सुरक्षा अधिकारी फरीद सिद्दीकी यांच्या नेतृत्वाखालील पथकाने प्रत्यक्ष गोडाऊनवर जाऊन ही यशस्वी कारवाई पूर्ण केली. जप्त करण्यात आलेल्या आईस्क्रीमचे नमुने पुढील तपासणीसाठी शासकीय प्रयोगशाळेत पाठवण्यात आले आहेत. प्रयोगशाळेचा अंतिम अहवाल प्राप्त झाल्यानंतर या प्रकरणात संबंधित दोषींवर पुढील कडक कायदेशीर कारवाई निश्चित केली जाणार असल्याचे अन्न व औषध प्रशासनाकडून सांगण्यात आले.



छत्रपती संभाजीनगर : हे दृष्य कुठल्या संचारबंदीचे नाही. शहरातील गत दंगलीत कारणीभूत ठरलेल्या फळविक्रेत्यांना कायद्याचा बडगा उगारताच पळापळ करणारे हातगाडी चालक पसार झाल्याने शहागंज रस्त्याने आता मोकळा श्वास घेतला असून वाहनधारक व जनता पोलीस प्रशासन व मनपाला धन्यवाद देत आहेत.

## जागतिक पर्यावरण दिनानिमित्त घाटीत वृक्षारोपण



हिंदू प्रकाशवार्ता, प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर, जागतिक पर्यावरण दिनानिमित्त शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी) येथे सर्जरी विभागातर्फे वाहनतळ परिसरात वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या हस्ते विविध रोपांची लागवड करण्यात आली. यावेळी पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व अधोरेखित करताना वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर झाडे ही नैसर्गिक संरक्षणाची प्रभावी साधने असल्याचे सांगण्यात आले. रुग्णालय परिसरातील हिरवळ वाढविण्यासाठी तसेच नवीन वाहनतळ परिसर अधिक पर्यावरणपूरक करण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला. जागतिक पर्यावरण दिनासोबतच अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून हा कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमास उपअधिष्ठाता डॉ. सुरेश हरबडे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुचिता जोशी, विभागप्रमुख डॉ. प्रभा खैरे-मोरे, डॉ. गायत्री तडवळकर, डॉ. पंकज, आशिका कनक बरालिया, संतोष शेळके, सुरेश भाले, मुराद बेग, संपत शेळके यांच्यासह कर्मचारी व अधिकारी उपस्थित होते.

# शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांनी घेतली अपघातग्रस्तांची भेट

## दोघांचा मृत्यू, दोन जणांना डिस्चार्ज तर 16 जखमीवर उपचार सुरु

**छत्रपती संभाजीनगर :** गुरुवार, 4 रोजी लग्नाचे वऱ्हाड घेऊन जाणाऱ्या टेम्पोचा वैजापूर-गंगापूर रस्त्यावर तालुक्यातील घायगाव शिवारात अपघात झाला होता. या अपघातात 2 ठार झाले असून, दोन जणांना रुग्णालयातून सुट्टी देण्यात आली. 20 वऱ्हाडीपैकी 16 जणावर छत्रपती संभाजीनगरातील घाटी रुग्णालयात उपचार सुरु आहेत. या सर्व अपघातग्रस्तांची शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांनी भेट घेत



विचारपूस केली.

यावेळी रुग्ण आणि नातेवाईक यांना आधार देत सर्वांना चांगला उपचार मिळून बरे होतील, अशी प्रार्थना खैरे यांनी केली. डॉक्टर आणि सर्व स्टाफ परिश्रम घेत असून, नातेवाईकांनी विश्वास ठेवण्याचे आवाहन केले.

अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे, उपअधिष्ठाता डॉ. सुरेश हरबडे, कर्करोग रुग्णालयाचे विशेष कार्य अधिकारी डॉ. अरविंद गायकवाड, अभ्यागत समिती सदस्य नारायण कानकाटे, उपशहरप्रमुख विजय सूर्यवंशी, महाराष्ट्र सुरक्षा बलाचे सुरक्षा अधिकारी सुरेश भाले आदी उपस्थित होते. पाटेगाव ता. पैठण येथील काशिनाथ रामचंद्र ठाकरे यांच्या मुलाचे लग्न येवला तालुक्यातील गोपाळवाडी येथील शिवाजी वाघ यांच्या मुलीशी शुक्रवारी असल्याने वऱ्हाडी जातं असताना अपघात झाला होता.

# जिल्हा परिषदेत वृक्षारोपण



**हिंदू प्रकाशवार्ता, प्रतिनिधी :** छत्रपती संभाजीनगर, जागतिक पर्यावरण दिनानिमित्त जिल्हा परिषद कार्यालय परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश गळांडे, उपाध्यक्ष जितेंद्र जैस्वाल, भाजप जिल्हाध्यक्ष संजय खंबायते, पंचायत समिती सभापती कल्याण गायकवाड तसेच जिल्हा परिषद सदस्य आणि विविध विभागांचे अधिकारी-कर्मचारी यांच्या उपस्थितीत वृक्षारोपण करण्यात आले.

यावेळी पर्यावरण संवर्धनाची गरज अधोरेखित करण्यात आली. वाढते प्रदूषण, जंगलतोड आणि हवामान बदलामुळे पृथ्वीसमोर गंभीर आव्हाने निर्माण झाली असून त्यावर मात करण्यासाठी वृक्षलागवड आणि वृक्षसंवर्धन हाच प्रभावी उपाय असल्याचे मान्यवरांनी सांगितले. प्रत्येक नागरिकाने पर्यावरण रक्षणासाठी पुढाकार घेऊन अधिकाधिक वृक्ष लावावेत आणि त्यांचे संगोपन करावे, असे आवाहनही करण्यात आले. दरम्यान, जिल्हा परिषदेच्या कृषी समितीमध्येही पर्यावरण संरक्षणाबाबत जनजागृतीपर माहिती देण्यात आली. कार्यक्रमामुळे पर्यावरण संवर्धनाचा संदेश समाजापर्यंत पोहोचला.

# घाटी रुग्णालयात टु व्हिलर मेकॅनिक असोसिएशनची आगळीवेगळी आरोग्यसेवा

## स्ट्रेचर, व्हिलचेयर, टेबल, बाकडे आदीची केली मोफत दुरूस्ती

**छत्रपती संभाजीनगर :** डॉक्टर, नर्स आणि स्टाफ हे रुग्णांच्या उपचारासाठी परिश्रम घेत असतात. मात्र पडद्यामागे प्रशासन, चतुर्थश्रेणी कामगार आणि परिसरात काम करणारे अनेक हात राबतात. अशीच काही आगळीवेगळी आरोग्यसेवा करण्याचा प्रयत्न औरंगाबाद टुव्हिलर मेकॅनिक असोसिएशन छत्रपती संभाजीनगरच्या वतीने करण्यात आली.

सेवेची संधी दिल्याबद्दल अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांचा संघटनेच्या वतीने स्वागत करण्यात आले. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी) येथे संघटनेच्या स्ट्रेचर, व्हिलचेयर, टेबल, बाकडे आदीची मोफत दुरुस्ती केली.

दररोज हजारो रुग्ण आणि नातेवाईक येथे येतात. त्यामुळे साहजिकच अनेकदा



यावस्तू खराब होतात. स्ट्रेचरची चाके, पेशंटला बसण्याची खुर्ची आणि बाकडे, टेबल आदीची मोफत दुरुस्तीची सुरवात ओपीडीमधुन करण्यात आली. याठिकाणी तीस खुर्च्यांची, सहा स्ट्रेचरची आणि इतर वस्तूची दुरुस्ती करण्यात आली. यानंतर यापुढे वर्षभर क्रमाक्रमाने पुर्ण घाटी रुग्णालयातील स्टेचर तसेच खुर्च्यांची दुरुस्ती करण्यात येणार आहे. या निष्काम कर्मयोग कार्यासाठी संघटनेच्या वतीने संस्थापक अध्यक्ष सय्यद चांद, जिल्हा समन्वय समितीचे अध्यक्ष राम पारखे, जिल्हा उपाध्यक्ष मुन्ना शेख, जिल्हा उपाध्यक्ष शेख नुर,विभागप्रमुख बाळासाहेब पवार, विभागप्रमुख सरवर खान, विभागप्रमुख शेख जमीर, विभागप्रमुख शेख सलीम, विभागप्रमुख अजय राजपूत योगदान देत आहेत. पुढील काळात कर्करोग रुग्णालय व घाटी परिसरात कामासाठी तालुकास्तरावरील पदाधिकारी या कार्यात सहभागी होणार आहेत.

# जिल्हा कृषी समितीच्या बैठकीत कृषी विकासासाठी विविध उपक्रमांवर भर

**हिंदू प्रकाशवार्ता, प्रतिनिधी :** छत्रपती संभाजीनगर, जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगरच्या कृषी समितीची मासिक सभा शुक्रवारी जिल्हा परिषद उपाध्यक्ष तथा कृषी समिती सभापती जितेंद्रजी जैस्वाल यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. बैठकीत जिल्ह्यातील कृषी विभागाच्या विविध योजनांचा आढावा घेण्यात आला.

यावेळी तालुकास्तरावर कृषी मालावरील प्रक्रिया उद्योग विकसित करण्यासाठी प्रयत्न करावेत, प्रक्रिया उद्योगांशी संबंधित प्रशिक्षण शिबिरे आयोजित करावीत तसेच शासकीय जागा उपलब्ध असलेल्या ठिकाणी रोपवाटिका विकसित करण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशा सूचना कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना देण्यात आल्या. तसेच शेतकरी ते थेट ग्राहक भाजीपाला विक्री उपक्रम राबविण्यावरही भर देण्यात आला.

बैठकीत समिती सदस्यांनीही विविध सूचना मांडल्या. कृषी सेवा केंद्रांवरील कारवाई पारदर्शकपणे व्हावी, अतिवृष्टीग्रस्त व वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांना लाभ मिळावा, शेतकऱ्यांशी गैरवर्तन करणाऱ्या कृषी सेवा केंद्र चालकांवर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली.

याशिवाय प्रत्येक तालुक्यात प्रायोगिक तत्त्वावर १० एकर क्षेत्रावर शासकीय बियाण्यांची लागवड करून उत्पादनक्षमता सिद्ध करावी, शेतकरी-ग्राहक भाजीपाला महोत्सव आयोजित करावा तसेच ग्रामस्तरावर माती परीक्षण शिबिरे घेण्यात यावीत, अशा सूचनाही बैठकीत करण्यात आल्या.

बैठकीस कृषी समितीचे सदस्य, कृषी विकास अधिकारी प्रकाश पाटील यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

# वेदांतनगर पोलीस ठाण्याचा पर्यावरण संवर्धनाचा संदेश; वृक्षारोपण व सायकल रॅली उत्साहात



हिंदू प्रकाशवार्ता, प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** वेदांत नगर पोलीस ठाण्याच्या वतीने वृक्षारोपण कार्यक्रम तसेच सामाजिक वनीकरण विभाग आणि वेदांत नगर पोलीस ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने सायकल रॅली चे आयोजन करण्यात आले. पर्यावरण संरक्षण आणि संवर्धनाचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला.

यानंतर आयोजित करण्यात आलेल्या सायकल रॅलीत मोठ्या संख्येने पोलीस अधिकारी, कर्मचारी, सामाजिक वनीकरण विभागाचे अधिकारी तसेच नागरिक सहभागी झाले. रॅलीद्वारे "झाडे लावा, झाडे जगवा" हा संदेश देण्यात आला. वाढते प्रदूषण, हवामानातील बदल आणि पर्यावरणीय असमतोल यावर मात करण्यासाठी वृक्षसंवर्धन काळाची गरज असल्याचे यावेळी सांगण्यात आले. या उपक्रमामुळे पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती होण्यास मदत झाली असून नागरिकांनीही अशा उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले.

# संलग्नीकरण शुल्कात 10 टक्के वाढ,कायम संलग्नित 116 महाविद्यालयांचा समावेश

## विद्या परिषद बैठकीत ठराव संमत

**छत्रपती संभाजीनगर, :** डॉ .बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाची कायमस्वरूपी संलग्नित ११६ महाविद्यालयांच्या संलग्नीकरण शुल्कात दरवर्षी १० टक्के वाढ करण्याचा निर्णय विद्या परिषद बैठकीत घेण्यात आला.

कुलगुरू डॉ. विजय फुलारी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या विद्या परिषदेच्या ऑनलाइन बैठकीत हा निर्णय घेण्यात प्र कुलगुरू डॉ .प्रवीण वक्ते, प्रभारी कुलसचिव डॉ . गणेश मंझा यांच्यासह सर्व अधिष्ठाता उपस्थित होते. तसेच ४० सदस्यांनी बैठकीत सहभाग घेतला.

बैठकीत विषय पत्रिकेवरील २५, पुरवणी विषय पत्रिकेवरील सात व ऐनवेळी चा एक अशा एकूण ३३ विषयांवर चर्चा होऊन मंजुरी देण्यात आली.

**प्रमुख निर्णय पुढीलप्रमाणे:** विद्यापीठाशी कायमस्वरुपात संलग्न असलेल्या ११६ महाविद्यालयांच्या संलग्नीकरण शुल्कात दरवर्षी १० टक्के वाढ करण्यास मान्यता. या संदर्भात डॉ श्याम शिरसाठ यांच्या अध्यक्षतेखालील समितीने अहवाल सादर केला. या अहवालातील प्रमुख चार शिफारसीना अधिष्ठाता मंडळाने मान्यता दिली. यातील चौथा व शेवटचा दरवर्षी दहा टक्के शुल्क वाढ करण्याचा प्रस्ताव या बैठकीत मंजूर करण्यात आला.

**एबीसी/एनईपी अंतर्गत पुढील नवीन अभ्यासक्रम सुरू करण्यास मान्यता :** बी.एस्सी. स्टॅटिस्टिक्स विथ डेटा ॲनालिटिक्स, बी.एस्सी. जिओइन्फॉर्मेटिक्स, बीबीए (ॲग्री बिझनेस मॅनेजमेंट), बी.एस्सी. ऑनर्स विथ रिसर्च, बी.एस्सी. प्रिंटिंग अँड पॅकेजिंग टेक्नॉलॉजी

बी.ए. शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमाची नवीन प्रथम व द्वितीय सत्र रचना २०२६ पासून लागू करण्यास मान्यता.

विद्यापीठातील विविध विभागांमध्ये करार पद्धतीने प्राध्यापक पदे भरण्यास व भरती प्रक्रियेच्या आवश्यक निर्देशांना मान्यता.

प्रकुलगुरु डॉ प्रवीण वक्ते यांच्यासह सहा संवैधानिक अधिकाऱ्यांची नियुक्ती गेल्या महिन्यात अत्यंत पारदर्शक रीतीने करून

# कन्नडमधील आरोग्य संस्थांची जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांकडून पाहणी

## एचपीव्ही लसीकरण, पल्स पोलिओ मोहीम आणि आरोग्य सेवांबाबत दिले महत्त्वाचे निर्देश

हिंदू प्रकाशवार्ता, प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर, :** मुख्य कार्यकारी अधिकारी मिनू पी. एम. यांच्या आदेशानुसार जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर यांनी कन्नड तालुक्यातील विविध प्राथमिक आरोग्य केंद्रे व आरोग्य संस्थांना भेट देऊन आरोग्य सेवांचा आढावा घेतला. हातनूर, चापानेर, औराळा, वडनेर, वेरूळ, चिखलठाणा तसेच कुंजखेडा उपकेंद्र आणि तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयाचा यात समावेश होता.

भेटीदरम्यान मनुष्यबळ, औषधसाठा, रुग्णसेवा, स्वच्छता, ई-औषधी, क्षयरोग निर्मूलन, सिकलसेल जनजागृती, एचपीव्ही लसीकरण, प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि "माझं गाव, आरोग्य संपन्न गाव" अभियानाचा आढावा घेण्यात आला. एचपीव्ही



लसीकरणाचे शंभर टक्के उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी पालकांचे समुपदेशन करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच २८ जूनच्या पल्स पोलिओ मोहिमेसाठी सूक्ष्म नियोजन करून शून्य ते पाच वर्षांतील एकही बालक वंचित राहू नये, असे निर्देश देण्यात आले. मुख्यालयी वास्तव्यास नसलेल्या अधिकारी-कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याचे निर्देश देत घरभाडे भत्ता व वेतनवाढ रोखण्याबाबत सूचना करण्यात आल्या. कुंजखेडा उपकेंद्रात समुदाय आरोग्य अधिकारी नसल्याने सेवा प्रभावित होत असल्याचे निदर्शनास आल्याने आठ दिवसांत आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून केंद्र कार्यान्वित करण्याचे आदेश देण्यात आले.

यावेळी आरोग्य सुविधांच्या विकासकामांची पाहणी करून कामे दर्जेदार व वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

## पर्यावरण दिनानिमित्त पर्यावरण पूरक सहल



**छत्रपती संभाजीनगर :** जागृती मंचच्या वतीने दोन जून रोजी तांदूळवाडी येथील पंचायत पुरुषोत्तम मंदिर येथे पर्यावरण पूरक आध्यात्मिक सहल काढण्यात आली. या सहलीमध्ये अनेक महिला सहभागी झाल्या. पुरुषोत्तमाचे दर्शन घेतलं, त्याचबरोबर पैठणच्या नाथ मंदिराचे ही दर्शन घेतलं. गोदावरीच्या साक्षीने संकल्प केला .परंतु या सहलीमध्ये सर्वात महत्त्वाचा भाग ठरला तो म्हणजे अध्यात्म आणि पर्यावरण यांचं सुरेख संगम पर्यावरण प्रेमी, निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळ ,महाराष्ट्र राज्य .यांच्या कार्याध्यक्ष निर्मला मस्के यांनी सहलीमध्ये अनेक बी बियाणं सर्व मैत्रिणींना दिली. त्याचबरोबर गाडीमधून येताना, प्रवास करताना शेजारी पाजारी शेत असेल, शेततळे असेल त्या ठिकाणी सर्व महिलांनी बी बियाण फेकली.

# होनाजी नगर वृक्षारोपणाने साजरा झाला जागतिक पर्यावरण दिन

**छत्रपती संभाजीनगर :** जागतिक पर्यावरण दिनानिमित्त होणाची नगर येथील छत्रपती राजश्री शाहू महाराज हाउसिंग सोसायटी, वरद विनायक कॉलनीच्या गार्डनमध्ये मोठ्या उत्साहात वृक्षारोपण कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाला प्रभाग २ च्या नगरसेविका सुवर्णलता उल्हास साळवे पाटील, नगरसेवक व शिवसेनेचे गटनेते किशोर नागरे आणि उल्हास साळवे पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. प्रशांत दंदे यांनी केले. पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व विशद करताना त्यांनी प्रत्येक नागरिकाने किमान एक झाड लावण्याचा संकल्प करावा, असे आवाहन केले. या उपक्रमात विनिता खरात, वैशाली पाटील, चैताली बेरड, डॉ. रंजना दंदे, रूपाली मुंढे, सुनीता पटवर्धन यांच्यासह महिला मोठ्या



संख्येने सहभागी झाल्या होत्या. सोसायटीच्या वतीने अध्यक्ष सुभाष जायभाये, सचिव बाळासाहेब पगारे, उपाध्यक्ष रघुनाथ सोनवणे, कोषाध्यक्ष डॉ. राजू पोपळघट, तसेच प्रभाकरराव देशमुख, प्रा. भीमराव रगडे, मदन माळे, डॉ. विकास गंभीरे, संजय शितोळे, मंगेश देशमुख, रोशन पाटील हे पदाधिकारी आणि सदस्य उपस्थित होते. सोसायटीच्या गार्डनमध्ये विविध प्रकारची देशी झाडे लावण्यात आली. उपस्थित मान्यवरांनी झाडे लावून पर्यावरण रक्षणाचा संदेश दिला. "आज लावलेली ही झाडेच उद्या परिसराला हिरवळ आणि शुद्ध हवा देतील," असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. हा उपक्रम नागरिकांमध्ये पर्यावरणाविषयी जागरूकता वाढवणारा ठरला असून सोसायटीच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911